
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२७
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## छत्तीसगडमध्ये चकमकीत १० नक्षलवाद्यांचा खात्मा



**सुकमा :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात शुक्रवारी (दि.२२) सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. या चकमकीत १० नक्षलवादी ठार झाले आहेत. सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितले की, आतापर्यंत ठार झालेल्या १० नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एके-४७, एसएलआर आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. बस्तरचे आयजी पी सुंदरराज यांनी सांगितले की, नक्षलवादी गुरुवारी ओडिशातून छत्तीसगडमध्ये घुसल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर जवानांनी नक्षलवाद्यांचा शोध सुरू केला. यादरम्यान नक्षलवाद्यांनी जवानांवर गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरात जवानांनीही गोळीबार केला. या चकमकीत १० नक्षलवादी ठार झाले. यानंतर भेज्जी परिसरात चकमक सुरू होती.

अंतरंग
मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश जारी/२
दक्षिण रायगडमध्ये ८५ हजार चाकरमान्यांनी केले मतदान/५
पर्थ कसोटीत भारतानंतर ऑस्ट्रेलियाचीही घसरगुंडी/८

### विधानसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार?

# आज निकाल; उत्कंठा शिगेला!

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीला सामोऱ्या गेलेल्या उमेदवारांचे राजकीय भवितव्य बुधवारी मतदानयंत्रात बंद झाले. उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते विजयाचे दावे प्रतिदावे करू लागले आहेत. आपलाच उमेदवार निवडून येणार याची खात्री देत कार्यकर्त्यांनी पैजाही लावल्या आहेत. त्यामुळे आता सर्वांनाच शनिवारी (दि. २३) लागणाऱ्या निकालाची उत्सुकता आहे.

रायगड जिल्ह्यात या वेळी चांगले मतदान झाले. मागील वेळच्या तुलनेत मतदानात दोन टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे हा वाढलेला टक्का कुणाच्या फायद्याचा ठरणार याची गणिते मांडली जात आहेत. शिवाय ५५ हजार युवा नवमतदारांनी नावनोंदणी केली होती. त्यामुळे यंदा युवा मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी उतरला होता. महिलांनीदेखील मोठ्या प्रमाणावर मतदान केले आहे. युवा व महिला मतदार कुणाच्या बाजूने झुकतो याकडे सर्व राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे.

सर्वच उमेदवार आणि त्यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी बैठका घेतल्या. त्यात स्थानिक पातळीवरील मतदानाचा आढावा घेण्यात आला. त्यावरून कुठल्या बूथवर आपल्या किती मतदान झाले आहे याचा अंदाज बांधला जात होता. अंदाजे आकडेवारी समोर आल्यानंतर गुलाल आपलाच याची जणू खात्री झाली आणि सोशल मीडियावर उमेदवाराचे फोटो विजयी अविर्भावात झळकू लागले. काही उमेदवारांच्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी उमेदवारांचे भलेमोठे बॅनर लावून निकालापूर्वीच विजयाबद्दल अभिनंदन करून शुभेच्छाही दिल्या आहेत.

जिल्ह्यात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र होते, तर महायुतीलाही काही प्रमाणात बंडखोरीने ग्रासले आहे. त्याचा फायदा विरोधी उमेदवारांना होईल किंवा कसे याचेही आडाखे मतदानानंतर बांधले जात आहेत. अपक्ष उमेदवार कितपत डोकेदुखी ठरू शकेल याचीही गणिते मांडली जात आहेत. गावागावात पारावर केवळ निवडणूक हा एकमेव चर्चेचा विषय राहिला आहे. शनिवारी मतमोजणीअंती निकाल लागून चित्र स्पष्ट होईल.

२३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी करण्यात येणार आहे. मतमोजणीसाठी दोन हजार ४५३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १८१ मतमोजणी पर्यवेक्षक, २०४ मतमोजणी सहाय्यक, १६५ मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक, १८३ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२), ९८६ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३), ७३४ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.




### इथे होणार मतमोजणी

रायगड जिल्ह्यात मतमोजणीसाठी प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणी ए.आर. काळसेकर पॉलिटेक्निक कॉलेज पनवेल, प्रशासकीय भवन कर्जत, दि.बा. पाटील मंगल कार्यालय जासई-उरण, केईएस लिटिल एंजल स्कूल पेण, जिल्हा क्रीडा संकुल नेहुली-अलिबाग, उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक महाड येथे केली जाणार आहे. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होऊन दुपारपर्यंत कल हाती येतील.

### त्रिस्तरीय बंदोबस्त

मतमोजणीसाठी सर्व केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतदान केंद्रांवर त्रिस्तरीय बंदोबस्त असेल. पहिल्या टप्प्यात निमलष्करी दल, दुसऱ्या टप्प्यात राज्य राखीव पोलीस दल, तिसऱ्या टप्प्यात स्थानिक पोलीस दल असा बंदोबस्त असेल. सर्व टप्प्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त सर्व मतमोजणी केंद्रांवर १०० पोलीस कर्मचारी व १० पोलीस अधिकारी असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### निकालासाठी वेबसाईट

निवडणुकीच्या निकाल पाहण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने https://results.eci.gov.in/index1.html ही वेबसाईट तयार केली आहे. निकालाच्या दिवशी म्हणजेच २३ नोव्हेंबरला सकाळी ८ वाजल्यापासून ही वेबसाईट कार्यान्वित होणार आहे. यावर निकालाचे ट्रेंड व माहिती मिळेल.



### अभीष्टचिंतन

**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे शुभ पाटील आदी उपस्थित होते.**







**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वतीने वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात फळांचे तसेच टॉवरवाडीतील आदिवासी बांधवांना धान्याचे वाटप शुक्रवारी करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सरपंच आनंद ढवळे, सुनील माळी, तालुका चिटणीस यतीन पाटील, शांताराम पोपेटा, सुनील पाटील, संतोष पाटील, विश्वजीत पाटील, मयुर कदम, शुभ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## निवडक

### एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेसाठी नवे प्रवेश प्रमाणपत्र आवश्यक

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) १ डिसेंबर होणाऱ्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४साठी उमेदवार प्रवेशपत्र ऑनलाईन प्रणालीतील खात्यात उपलब्ध करून देण्यात आले आहे. ही परीक्षा यापूर्वी २५ ऑगस्ट रोजी घेतली जाणार होती व त्या परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेशपत्रे वितरित करण्यात आली होती, मात्र १ डिसेंबर रोजी होणाऱ्या परीक्षेला उमेदवारांना जुन्या प्रवेश प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांनी नव्याने उपलब्ध केलेले प्रवेशपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

### दिल्लीच्या सर्व प्रवेश बिंदूंवर तपास चौक्या उभारण्याचे निर्देश

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकार आणि पोलिसांना राष्ट्रीय राजधानीत ट्रकच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी दिल्लीच्या सर्व ११३ प्रवेश बिंदूंवर तत्काळ चौक्या उभारण्याचे निर्देश दिले. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले आहेत हे विशेष.

## मावळमध्ये प्रसिद्ध बैलगाडा मालकाची खंडणीसाठी हत्या

**मावळ : प्रतिनिधी**




पुण्याच्या मावळमध्ये बैलगाडा मालकाचे अपहरण करून ५० लाखांच्या खंडणीसाठी हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पंडित जाधव असे अपहरण करून हत्या करण्यात आलेल्या बैलगाडा मालकाचे नाव आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी सुरज वानखेडे याला खंडणीविरोधी पथकाने अटक करण्यात आली आहे. हत्येच्या कटात सहभागी असलेला आरोपी रणजीत कुमार हा फरार आहे.

हत्या झालेले पंडित जाधव यांच्याकडे आरोपी सुरज वानखेडे हा भाडेकरू म्हणून राहत होता. त्यांचे अनेक छोटे-मोठे व्यवहार तो पहायचा. अगदी त्यांचा मोबाईलदेखील सुरज हाताळत असे. यामुळे पंडित जाधव यांच्याकडे पैसे किती आहेत याचा अंदाज त्याला आला होता. त्यांच्या घराचे बांधकामदेखील सुरज आणि त्याच्या वडिलांनी केले होते. १४ नोव्हेंबर रोजी सुरजने जाधव यांना फोन करून बोलून घेतले आणि मित्र रणजीत कुमारच्या मदतीने त्यांचे अपहरण केले. सुरजला जाधव यांच्या मोबाईलचा पासवर्ड माहित होता. त्याने त्यांच्या पत्नीकडे ५० लाखाच्या खंडणीची मागणी केली. याबाबत पोलिसांना काही माहिती दिल्यास त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. सुरज हा हत्या झालेल्या जाधव यांच्या मोबाईलचा वापर करून त्यांच्या घरच्यांना धमकावत होता. दरम्यान, सुरजने पंडित यांची दोरीच्या साह्याने गळा आवळून हत्या केली. अखेर जाधव कुटुंब पोलिसांकडे गेले आणि त्यानंतर पोलिसांनी या घटनेचा उलगडा केला. तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर आणि सीसीटीव्ही फुटेज्या आधारे खंडणीविरोधी पथकाने सुरज वानखेडे याला अटक केली.

सुरजने पंडित जाधव यांची हत्या केल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी जाधव यांच्या घरातील व्यक्तींना व्हॉट्सॲपवर मेसेज करून त्यांची चारचाकी गाडी बोलून घेतली. ती गाडी घेऊन जाधव यांचा मृतदेह त्या गाडीत ठेवला. एक दिवस मृतदेह गाडीतच होता. अखेर जाधववाडी परिसरातीलच काही अंतरावर डोंगराच्या जवळ त्यांचा मृतदेह जाळण्यात आला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. हत्येच्या कटात सहभागी असलेला आरोपी रणजीत कुमार हा फरार आहे. त्याचाही शोध सुरू आहे.

## एसटी बसमध्ये नोटांची बंडल

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यात एका एसटी बसच्या सीटखाली प्रवाशाला नोटांची बंडल आढळून आल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे मतदानाअगोदर दोन दिवसांपूर्वी हीच बस स्ट्राँग रुमपासून ईव्हीएम आणि कर्मचाऱ्यांना घेऊन मतदान केंद्रावर गेली होती. त्यानंतर याच बसने कोपरगाव-वैजापूर-कोपरगाव अशा फेऱ्या केल्या. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील ही घटना असून एसटी आगार व पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे. या बसमधून प्रवास करणाऱ्या एका युवकाने प्रामाणिकपणा जपत बसमध्ये सापडलेली पाचशे रुपयांची दोन बंडल वाहकाकडे सुपूर्द केली आहेत. बंडलमधील नोटांची बेरीज केली असता तब्बल ८६ हजारांची रोख रक्कम असल्याचे दिसून आले. ही रक्कम नेमकी कोणाची आहे आणि बसच्या सीटखाली कशी आली याचा पोलीस तपास करीत आहेत.

## मनसे नेते बाळा नांदगावकरांकडून उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर यांनी शुक्रवारी (दि. २२) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीत काय घडले याबाबत स्वतः नांदगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना सविस्तर माहिती दिली.

आमदार कालिदास कोळंबकर यांच्या मुलाचे लग्न आहे. म्हणून ते सकाळी राज ठाकरेंकडे आले होते. त्यांनी राज यांनी पत्रिका दिल्यानंतर ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रिका द्यायला जात होते. ते म्हणाले की चला सोबत, म्हणून मीही त्यांच्याबरोबर आलो. फडणवीस यांची भेटही झाली. या भेटीदरम्यान मी त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच निवडणुकीत त्यांनी मला पाठिंबाही दिला होता, म्हणून मी त्यांचे आभार मानले. राजकारणाबाबत बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत ते मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजपचे नेते घेतील, तो त्यांचाच अधिकार आहे, असे बाळा नांदगावकर यांनी या वेळी सांगितले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर घडामोडींना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी भाजप नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावल्याचे सांगितले जात आहे.

## विधानसभा मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २८८ मतदारसंघांकरिता २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. या मतदानात एकूण सहा कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी आपला सहभाग नोंदवला. यामध्ये एकूण तीन कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरुष, तीन कोटी सहा लाख ४९ हजार ३१८ महिला, तर एक हजार ८२० इतर मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

या निवडणुकीत झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रकाशित झाली आहे. यात प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांचा समावेश आहे. मतमोजणी करताना टपाली मतदानाचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्षाद्वारे भरण्यात आलेला १७ सी हा प्रत्यक्ष झालेल्या मतदानासंदर्भातील फॉर्म उमेदवारांच्या प्रतिनिधींनाही देण्यात आला असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात येत आहे.

## राज्यात निवडणुकीशी संबंधित १५९ गुन्हे

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी राज्यभरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. निवडणुकीदरम्यान १५९ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यात अदखलपात्र गुन्ह्यांचाही समावेश आहे.

निवडणुकीशी संबंधित मुंबईत दोन, ठाण्यात चार गुन्हे, नवी मुंबईत तीन गुन्ह्यांचा समावेश आहे. परळी येथे ईव्हीएम मशीन मोडतोडीप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात ११ जणांना अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. या प्रकरणी जवळपास ४० जणांवर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले.

# जाहीर माफी मागा; अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## भाजप नेते विनोद तावडेंची तीन काँग्रेस नेत्यांना नोटीस

**मुंबई : प्रतिनिधी**

विरारच्या विवांता हॉटेलमध्ये भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे पैसे वाटप करत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीने केला होता. या आरोपानंतर विरोधकांनी विनोद तावडे आणि भाजपवर टीका केली. दरम्यान, तावडे आणि भाजपच्या नेत्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले होते. आता त्यांनी मतदारांना पैसे वाटल्याचे आरोप करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. माध्यमांशी बोलताना यांनी यासंबंधी माहिती दिली.



काँग्रेस नेत्यानी माझी आणि माझ्या पक्षाची बदनामी करण्यासाठी जाणिवपूर्वीक अशी विधाने केल्याचे भाजप नेते विनोद तावडे म्हणाले आहेत. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला १९ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि पक्षाच्या प्रवक्त्या सुप्रिया यांनी विनोद तावडे हे पाच कोटी रुपये मतदारांना वाटताना रंगेहात सापडले अशी विधाने केली. त्यांना या नाटकी विधानांनी त्यांना मला आणि माझ्या पक्षाला बदनाम करायचे होते. मी एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून येतो. गेली ४० वर्षे मी राजकारणात आहे, पण मी असे काम कधीच केले नाही, मात्र काँग्रेसच्या नेत्यांना माझी, पक्षाची आणि माझ्या नेत्यांची बदनामी करायची होती, म्हणून ते जाणीवपूर्वक मीडिया, ट्विटर आणि लोकांसमोर खोटे बोलले. त्यामुळे मी त्यांना कोर्टाची नोटीस पाठवली आहे. त्यांनी जाहीर माफी मागावी; अन्यथा कारवाईला सामोरे जावे.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे १९ नोव्हेंबर रोजी विरारच्या विवांत हॉटेलमध्ये आले होते. भाजपच्या या मतदारसंघातील उमेदवाराची भेट घेण्यासाठी तावडे या हॉटेलमध्ये आल्याचे सांगितले गेले, मात्र त्याचवेळी बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते क्षितिज ठाकूर यांच्यासमवेत हॉटेलमध्ये आले. या कार्यकर्त्यांकडून तावडेंकडून पैसे वाटप केल्याचा आरोप करण्यात आला. तावडे यांनी मात्र सर्व आरोप फेटाळून लावले.

'मी निवडणुकीसंदर्भातील काही गोष्टी सांगण्यासाठी तिथे पोहचलो होतो. त्या वेळी बविआचे कार्यकर्ते तिथे आले, त्यांचा असा गैरसमज झाला की, मी पैसे वाटतो आहे, पण या प्रकरणी आता निवडणूक आयोग आणि पोलीस तपास करत आहेत. हॉटेलमध्ये सीसीटीव्ही फुटेजही आहे. मी गेली ४० वर्ष राजकारणात आहे. जे सत्य आहे, ते समोर आहे. माझीसुद्धा मागणी आहे की या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी,' अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली होती. त्यानंतर आता त्यांनी या प्रकरणी बदनामी करणाऱ्या तीन काँग्रेस नेत्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

# मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश जारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४च्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषीत केलेला असून त्यानुसार जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघामध्ये २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.



त्यानुषंगाने रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात १८९- कर्जत मतमोजणी केंद्र प्रशासकीय भवन, कर्जत, ता.कर्जत, १९१-पेण मतमोजणी केंद्र के.इ.एस. लिटील एंजल स्कूल, पेण, ता.पेण, १९२-अलिबाग मतमोजणी केंद्र जिल्हा क्रिडा संकुल, नेहुली, ता.अलिबाग, १९३-श्रीवर्धन मतमोजणी केंद्र उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन ता. श्रीवर्धन, १९४-महाड मतमोजणी केंद्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड, ता. महाड, परिसरात मतमोजणी होणार आहे. या परिसरात सर्व पक्षाचे प्रतिनिधी व त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने एकत्र जमणार आहेत. त्यामुळे या परिसरात जनतेच्या जिवीतास व मालमत्ता, आरोग्यास धोका निर्माण होवून सार्वजनिक शांतता बिघडून दंगल, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील १९८-कर्जत,१९१-पेण, १९२-अलिबाग,१९३-श्रीवर्धन, १९४-महाड विधानसभा मतदार संघातील निवडणूक ही संवेदनशील असून मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्राच्या परिसरात काही राजकीय पक्ष, संघटना यांचे कार्यकर्ते, प्रतिनिधी यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा व सुरक्षिततेचा भंग होऊन, गैरप्रकार घडून मतमोजणी प्रक्रियेस बाधा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच नमूद ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, शांतता व सुरक्षेचा भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुसार जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) (३) अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्या अनुषंगाने रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील १९८-कर्जत,१९१-पेण, १९२-अलिबाग,१९३-श्रीवर्धन, १९४-महाड या विधानसभा मतदार संघामध्ये २३ नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मत मोजणी प्रक्रियेकरीता मतमोजणी केंद्राच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरासाठी खालील प्रमाणे मनाई आदेश जारी केला आहे.

मतमोजणी केंद्राच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात मतमोजणीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी, पोलीस अधिकारी, उमेदवार, उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी व मतमोजणीच्या कामाकरीता संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी विधानसभा मतदार संघ यांनी पारीत केलेले अधिकृत ओळखपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती व्यतिरीक्त अन्य व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल फोन, आयपॅड, लॅपटॉप किंवा ऑडीओ/व्हिडीओ रेकॉर्डीग क्षमता असलेली तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने सोबत बाळगणेस मनाई आहे. (निवडणुकीशी संबधित कामाकरीता नियुक्त केलेले अधिकारी / कर्मचारी यांना लागू नाही.) मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे. परवाना दिलेली शस्त्रे वा अवैध शस्त्रास्त्रे / धारधार शस्त्रे मतमोजणी केंद्रापासून १०० मीटरच्या आत घेवून जाऊ नये. (अपवाद - मतमोजणी केंद्राच्या सुरक्षेकरीता नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांना शस्त्र १०० मीटरच्या आत घेवून जाता येईल). मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यास येत आहे. मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात शासकीय वाहने तसेच परवानगी दिलेली वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे. मतमोजणी निकाल झाल्यानंतर मतमोजणी केंद्राचे १०० मीटर परिसरात घोषणाबाजी करण्यास, फटाके वाजाविण्यास, विजयी मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात येत आहे. मनाई आदेश हा मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी ००.०१ वा. पासून ते २३ नोव्हेंबर रोजी २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

# ऐरोली, बेलापूरमध्ये मतमोजणीची तयारी पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील मतदान पार पडले असून येत्या शनिवार, दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व १८ मतदारसंघात मतमोजणी होणार आहे. या मतमोजणीसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा, पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.

ऐरोली मतदार संघात ५४ टक्के तर बेलापुर मतदार संघात ५५ टक्के मतदान झाले आहे. नवी मुंबईत २०१९ पेक्षा जास्त मतदान यंदा झाले आहे. त्यामुळे हे वाढलेले टक्के कोणासाठी फायदेशीर ठरणार हे पाहावे लागणार आहे. प्रत्येक मतदारसंघातील मतमोजणी केंद्रात सकाळी ०८.०० वाजता मतमोजणीस प्रारंभ होणार आहे. प्रत्येक मतदारसंघात टेबल व फेऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.



१५० ऐरोली मतदारसंघाची मतमोजणी सरस्वती हायस्कूल सेक्टर ०५ ऐरोली येथे होणार असून एकूण २० फेऱ्या होणार आहेत. मतमोजणीसाठी १९ टेबल असणार आहेत.मतमोजणीसाठी १५० अधिकारी व कर्मचारी आणि १५० पोलीस नियुक्त करण्यात आले आहेत. १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी आगरी कोळी भवन, नेरूळ येथे होणार असून एकूण मतमोजणीच्या २८ फेऱ्या होणार आहेत. त्यासाठी १४ टेबल असून टपाली मतपतमतपत्रिकेसाठी ४ टेबल आणि व्हीव्हीपॅटसाठी वेगळा एक टेबल असणार आहे. मतमोजणी प्रक्रियेसाठी २०० अधिकारी, कर्मचारी आणि ३०० पोलीस नियुक्त करण्यात आले आहेत.

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व ईव्हीएम यंत्रे ही संबंधित मतदारसंघातील स्ट्राँगरुममध्ये अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. ही ईव्हीएम यंत्रे निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सिलबंद करण्यात आल्या आहेत. तसेच स्ट्राँगरुम भोवती केंद्रीय राखीव पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल व स्थानिक पोलीस, अशी त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. मत मोजणी केंद्राभोवतीचे काही मीटर अंतरावरील रस्ते बंद ठेवण्यात आले आहेत. पत्रकारांसाठी वेगळा कक्ष तयार करण्यात आला आहे.

# नाशिकमध्ये निवडणूक निकालानंतर मिरवणुकीला बंदी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक शहरात निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी उमेदवारांना मिरवणुका काढण्यास पोलीस प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली आहे.



नाशिक शहरातील प्रत्येक उमेदवारांच्या कार्यालय आणि निवासस्थानाबाहेर पोलिसांचा तगडा बंदोबस्त असणार आहे. निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर शहरात नाशिक शहर पोलीस आणि राज्य राखीव दलाच्या तुकड्या तैनात असणार आहेत. त्यासाठी, मोठ्या प्रमाणात फौजफाटा नाशिक शहरात दाखल झाला आहे. नाशिक शहरात विविध ठिकाणच्या चार ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

नाशिक पूर्व, मध्य, पश्चिम आणि इगतपुरी ह्या चार मतदारसंघाची मतमोजणी शहरातील विविध ठिकाणी होणार आहे. त्यामुळे, शहरात वरिष्ठ अधिकारी, पोलिस निरीक्षकांसह हजारो पोलिस कर्मचारी तैनात असणार आहेत. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, निकालानंतर शहारातील वातावरण शांततामय राहण्यासाठी पोलिसांचा तगडा पाहारा असणार आहे.

नाशिक शहरात मतमोजणी केंद्राच्या बाहेर नाशिक शहर पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त असणार असून उद्या नाशिक शहरातील चार विधानसभा मतदारसंघाचा निकाल जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने नाशिक शहर पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे.

या संदर्भात पोलीस उपयुक्त गुन्हे शाखा प्रशांत बच्छाव यांनी संवाद साधला. त्यावेळी, शहरात उद्या निवडणूक निकालानंतर रॅली किंवा मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात येणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे, नाशिक शहरातील कार्यकर्त्यांच्या उत्साहाला व आनंदाला काहीसा ब्रेक मिळणार आहे. त्यामुळे, निकालानंतर उमेदवाराच्या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी गुलाल उधळा, पण डिजे वाजयवायला परवानगी नाहीच.

दरम्यान, राज्यातील २८८ मतदारसंघातील निवडणुकांसाठी उद्या २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात केली आहे. मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी लक्षात घेत मतदारसंघात निकालाच्या फेऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

# घाटकोपरमध्ये मोटारगाडीच्या अपघातात दोन पोलीस जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवरील छेडा नगर परिसरातून शुक्रवारी पहाटे जात असलेल्या कंटेनरला चालकाने अचानक ब्रेक लावल्याने मागून आलेली पोलीस मोटारगाडी त्यावर आदळली. या अपघातात दोन पोलीस जखमी झाले असून त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हा अपघात शुक्रवारी पहाटे ५ च्या सुमारास मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवरील छेडा नगर परिसरात घडली. चेंबूरच्या टिळक नगर पोलीस ठाण्याचे काही कर्मचारी गस्त घालण्यासाठी छेडा नगर परिसरात जात होते.

या वेळी अचानक थांबलेल्या कंटेनर पोलिसांचीगाडी आदळली. या अपघातात टिळक नगर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई जगदीश पाटील आणि साहिल खामकर जखमी झाले. त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत टिळक नगर पोलिसांनी कंटेनर चालक बिपीन सिंह (वय २२) याला ताब्यात घेतले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# मतदान प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे योगदान

## * दिव्यांग, ज्येष्ठ मतदारांना केली मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासाठी मतदाराच्या मदतीसाठी सात हजार ११५ स्वयंसेवक मुंबईतील विविध मतदान केंद्रांवर कार्यरत होते. यामध्ये ९८ महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेत (एनएसएस) सहभागी दोन हजार ८०० विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) ७५० विद्यार्थी, नागरी संरक्षणातील ३२३ सदस्य, आपदा मित्र/सखी २००, नेहरू युवा केंद्राचे ३८ सदस्य आणि अन्य तीन हजार सदस्य यांचा समावेश होता.

निवडणूक आयोगाने प्रथमच १८ वर्षांखालील मुलांना स्वयंसेवक नेमण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार मतदान केंद्रावर किशोरवयीन मुले-मुली पाहायला मिळाली. या स्वयंसेवकांनी मतदान केंद्रांवर दिव्यांग तसेच ज्येष्ठ मतदारांना सहाय्य, रांगांचे व्यवस्थापन आदी जबाबदाऱ्या योग्यपणे पार पाडल्या. त्यामुळे मतदान प्रक्रियाही सुरळीत पार पडण्यास मदत झाली.



**निवडणूक आयोगाकडून स्वयंसेवक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. रांगेचे व्यवस्थापन करण्यात मी मदत करत आहे. मतदान करत नसलो तरी मतदान प्रक्रियेत मदत करत असल्याचा आनंद आहे.**

**-सुमित वानखेडे, स्वयंसेवक**

**दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक यांना मदत करण्याची जबाबदारी होती. त्यांना गेटपासून मतदान खोलीपर्यंत सोडले, परत जाण्यासाठी मदत केली.**

**- आयुष गायकवाड, स्वयंसेवक**

# एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेसाठी नवे प्रवेश प्रमाणपत्र

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) १ डिसेंबर होणाऱ्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४साठी उमेदवाचे प्रवेशपत्र ऑनलाईन प्रणालीतील खात्यात उपलब्ध करून देण्यात आले आहे. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ यापूर्वी २५ ऑगस्ट रोजी घेतली जाणार होती. त्या




परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेशपत्रे वितरित करण्यात आलेली होती, मात्र १ डिसेंबर रोजी होणाऱ्या परीक्षेला उमेदवारांना जुन्या प्रवेश प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांनी नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

एमपीएससीने या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणाऱ्या अडचणी किंवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास आधी संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे, तसेच प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास आधी परीक्षा कक्षातील स्वतः च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही अथवा या संदर्भात एमपीएससीची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही, असे नमूद करण्यात आले आहे.

परीक्षा कक्षात प्रवेश मिळण्यासाठी एमपीएससीच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून मुद्रित केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. तसेच परीक्षेवेळी उमेदवारांनी एमपीएससीच्या मार्गदर्शक सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे.

एमपीएससीकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांवर एमपीएससीच्या स्वेच्छाधिकारानुसार ठराविक कालावधीसाठी किंवा कायमस्वरुपी प्रतिरोधनाची, प्रचलित नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# पशुवैद्यकीय रुग्णालय सुरू होण्यास दिरंगाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील पशु-पक्ष्यांवर उपचार करण्यासाठी महापालिकेने जुईनगर सेक्टर २४ येथे आधुनिक पद्धतीने पशुवैद्यकीय रुग्णालय उभारले आहे. मागील काही वर्षांपूर्वीच इमारतीचे काम पूर्ण झाले आहे; मात्र रुग्णालय चालविणारी संस्था न मिळाल्याने ते सुरू झालेले नाही. यामुळे शहरातील प्राणिप्रेमींनी नाराजी व्यक्त करून ते लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे.

शहरातील प्राणी, पक्षी यांच्याकडेही विशेष लक्ष देण्यात येत असून शहरात पशुवैद्यकीय रुग्णालय बांधण्याची मागणी होत होती. त्यानुसार जुईनगर सेक्टर २४ येथे सिडकोकडून हस्तांतरित झालेल्या भूखंडावर महापालिकेच्या माध्यमातून हे रुग्णालय उभारले आहे. या दोन मजली पशुवैद्यकीय रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला असून फर्निचरची कामेदेखील झाली आहेत. या पशुवैद्यकीय रुग्णालयामुळे पशु-पक्ष्यांच्याही आरोग्याची काळजी घेतली जाणार असून हे रुग्णालय आऊटसोर्सच्या माध्यमातून चालविले जाणार आहे. यासाठी महापालिकेच्या माध्यमातून निविदादेखील मागविल्या होत्या; मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता. आचारसंहितेनंतर पुन्हा निविदा मागविण्यात येणार आहेत. रुग्णालय सुरू होण्यासाठी विलंब होत असल्याने प्राणिप्रेमींकडून नाराजी व्यक्त होत आहे.

### या आहेत सुविधा

*जुईनगर येथील पशुवैद्यकीय इमारतीमध्ये लहान, मोठ्या प्राण्यांसाठी शस्त्रक्रिया व तपासणी कक्ष, श्वान आणि पक्षांकरिता स्वतंत्र कक्ष, स्टरलाइजेशन खोली, चेंजिंग व प्रिपरेशन खोली, डॉक्टरांसाठी खोली, प्रतीक्षा कक्ष, कार्यालय व मीटिंग कक्ष, रेकॉर्ड रूम, लॉन्ड्री व स्टोअर रूम, औषधवाटप कक्ष, प्रयोगशाळा कक्ष, कर्मचारी विश्रांती कक्ष, प्रत्येक मजल्यावर स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था, तसेच प्राणी व नागरिकांकरिता स्वतंत्र लिफ्टची व्यवस्था करण्यात आली आहे.*

# आज कालभैरवाची जयंती

प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमीला कालाष्टमी असते. मात्र कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी कालभैरवाची जयंती असते. या दिवशी भगवान कालभैरवाने अवतार घेतला होता असे मानले जाते. या दिवशी भगवान भैरवांची पूर्ण विधीपूर्वक पूजा केली जाते. भगवान भैरव हे भगवान शिवाचे रौद्र रूप आहेत. कालभैरव जयंती कधी आहे त्याचे महत्व मान्यता आणि कथा जाणून घेऊया...



कार्तिक महिन्याची कृष्ण पक्ष अष्टमी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी असून, कालभैरव अष्टमीच्या दिवशी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करून व्रत करावे. या दिवशी भगवान शंकरासमोर दिवा लावून तसेच, भगवान कालभैरवाची पूजा करावी, संध्याकाळी मंदिरात जाऊन भगवान भैरवाच्या मूर्तीसमोर चारमुखी दिवा लावा आणि त्यांची मनोभावे पूजा करा. देवाला फुले, जिलेबी, उडीद, पान, नारळ इत्यादी वस्तू अर्पण करा. यानंतर भगवंताच्या समोर आसनावर बसून कालभैरव चालीसाचा पाठ अवश्य करावा किंवा ॐ भैरवाय नमः मंत्राचा जप करावा.

कथा अशी की...

शिव महा पुराणाच्या आधारे असे संगतात की, भगवान विष्णु आणि ब्रह्मा याच्यात संवाद चालला असता ब्रह्मा म्हणाले के, मीच या सृष्टीचा कर्ता असून सर्व देवांनी माझीच स्तुती करावी. हे ऐकून भगवान शिवांना क्रोध आला आणि त्यांनी ब्रह्माला शासन करण्यासाठी कालभैरवाची उत्पत्ती केली. ब्रह्माच्या पाच मस्तकांपैकी एक मस्तक कालभैरवाने उडवले, परंतु ब्रह्माच्या शिरच्छेदाबद्दल अपराधी भावना वाटू लागली आणि त्यामुळे कित्येक युगांपर्यंत, जो पर्यंत पापमुक्त होत नाही तो पर्यंत कालभैरवाचे ते मस्तक वाहत होते.

कालभैरव जयंती कथा

दुसरी एक कथा अशी सांगतात की, देवांचा राजा दक्षची कन्या सतीने मनोमन भगवान शिवालाच आपला वर मानले होते आणि विवाह केला, परंतु हे दक्षाला मान्य नव्हते, कारण शिव स्मशानात राहतो, अंगाला प्रेतभस्म लावतो आणि सोबत भुते असतात. नंतर जेव्हा दक्षाने मोठा यज्ञ केला तेव्हा त्याने शिव सतील बोलावले नाही. परंतु सती न बोलावताहि यज्ञाला आली त्यामुळे दक्ष शिवाला दुषणे देउन, अर्वाच्य भाषेत शिव्याशाप करू लागला, हे सहन न होऊन सतीने तिथेच प्राणत्याग केला. हे पाहून शिवाला अतिशय दुःख झाले, आणि त्याने रागाने यज्ञाचा विध्वंस केला तसेच दक्षाचा वध केला. दुःख अनावर झाल्याने, शिव सतीचे प्रेत खांद्यावर घेऊन त्रिलोकात फिरु लागला. आणि यामुळे सृष्टीचा नाश होऊ लागला. ते पाहुन भगवन विष्णुने आपल्या सुदर्शन चक्राने सतीचे तुकडे केले, तेव्हा हे तुकडे ज्या ज्या ठिकाणी पृथ्वीवर पडले त्या त्या ठिकाणी शक्तिपीठ निर्माण झाले. या शक्तिपीठांच्या रक्षणासाठी शिवाने कालभैरवाची उत्पत्ती केली, म्हणुन त्या त्या ठिकाणी कालभैरवाचे मंदिर असतेच, अशी मान्यता आहे.

# मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज



**पनवेल : वार्ताहर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणुकीच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाली असून निवडणूक यंत्रणा मतमोजणीसाठी तयार झाली आहे.

याकरिता १८१ मतमोजणी पर्यवेक्षक, २०४ मतमोजणी सहाय्यक, १६५ मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक, १८३ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२), ९८६ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३), ७३४ चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण दोन हजार ४५३ अधिकारी, कर्मचार्यांची मतमोजणीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल ए.आर.कालसेकर पॉलिटेक्नीक कॉलेज, पनवेल, ठाणा नाका जवळ, कर्नाळा स्पोटर्स अॅकेडमी समोर, पनवेल येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या २४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेर्याची संख्या २५ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक ३८, मतमोजणी सहाय्यक ३८, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक ३८, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) ४५, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) ३१०, चतुर्थ श्रेणी कर्मचारी २२० तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून दुनी चंद्र राणा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक पोलिसांसह एसआरपीचे पथक तैनात करण्यात आले आहे. तसेच आग किंवा दुर्घटना घडल्यास अग्नीशमन दलाचे बंबसुद्धा येथे उभे करून ठेवण्यात आले आहेत. सर्व कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे तैनात करण्यात आले आहेत.

**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघात शनिवारी (२३) जासई-उरण येथील दि.बा. पाटील सभागृहात होणाऱ्या मतमोजणीसाठी जय्यत तयारी सुरू झाली आहे.

उरण मतदारसंघातील मतदान केंद्रावरील ३५५ ईव्हीएम मशीन स्ट्रॉग रूममध्ये कडक बंदोबस्तात ठेवण्यात आलेल्या आहेत. बंदोबस्तासाठी तीन पदरी सुरक्षा कवच तयार करण्यात आले आहे. यामध्ये ७५ सशस्त्र दलाच्या जवानांचा जागता पहारा ठेवण्यात आला आहे. स्ट्रॉग रुम समोर आतमध्ये सेंट्रल आर्म पोलीस फोर्सची २४ सशस्त्र जवानांची तुकडी तैनात करण्यात आली आहे. मिडल कॉर्टनमध्ये सशस्त्र राज्य पोलीस दलातील २४ जवानांचा जागता पहारा ठेवण्यात आला आहे.

आऊटर कॉर्टनमध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील २४ ग्रुप सीएसआर जवानांचा खडा पहारा तैनात करण्यात आला आहे. यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस निरीक्षक -१, पोलिस उपनिरीक्षक-२ अशा एकूण ७५ सशस्त्र जवानांचा जागता पहारा तैनात करण्यात आला असल्याची माहिती न्हावा-शेवा बंदर विभागाचे एसीपी डॉ. विशाल नेहूल यांनी दिली.

स्ट्रॉग रूम, सशस्त्र सुरक्षा रक्षक, मतदान यंत्रांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या पोलिसांचा बंदोबस्ताबरोबरच ईव्हीएम मशीनच्या मतमोजणी केंद्रावर १५ सीसीटीव्हीतून सुरक्षेची पाहणी होत असल्याची माहिती उरण विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.उध्दव कदम यांनी दिली.

मतमोजणीसाठी १४ टेबल लावण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलावर होणाऱ्या मतमोजणीसाठी तीन कर्मचारी असे एकूण ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.२३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार आहे. साधारणता २६ फेऱ्यांमध्ये मतमोजणी पुर्ण होईल. दुपारी एक-दीड वाजेपर्यंत उरणच्या निकाल जाहीर होण्याची शक्यता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.उध्दव कदम यांनी दिली.



# दिवसा उष्मा, रात्री थंडी!

## ✻ वातावरण बदलाचा नागरिकांना त्रास
## ✻ लहान मुलांसह तरुणांनाही सर्दी-खोकला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हवामानाचे स्वरूप हळूहळू बदलत आहे. रात्रीच्या तापमानात किंचित घट झाली आहे, मात्र सकाळी ११ ते दुपारी चार वाजेपर्यंत कडक उन्हामुळे पनवेलकर घामाघूम होत आहेत. रात्री २१ ते २२ अंशांच्या दरम्यान, तर दिवसा ३४ ते ३५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत आहे. दिवसा आणि रात्रीच्या तापमानात आठ किंवा नऊ अंशांचा फरक असावा, जो सध्या १२ अंश किंवा त्याहून अधिक आहे. त्यामुळे शरीरावर विपरीत परिणाम होत आहे.

पनवेल आणि आजूबाजूच्या शहरात राहणाऱ्या लोकांना हंगामी आजारांचा प्रादुर्भाव होत आहे. महापालिकेच्या रुग्णालयातील डॉक्टरांचे दवाखाने आणि ओपीडीमध्ये व्हायरल रुग्णांची (सर्दी, खोकला, ताप) संख्या वाढली आहे. दिवसा प्रचंड उष्णता आणि रात्री किंचित थंडीचा हा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. बाहेर पडताना काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. कोल्ड्रिंक्स टाळायला हवे, असे त्यांचे म्हणणे आहे. घरच्या स्वयंपाकघरात शिजवलेले अन्न खाणे हा उत्तम पर्याय आहे.

प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार १३ आणि १९ नोव्हेंबर रोजी रात्रीचे तापमान १९ अंश सेल्सिअस होते. १३ आणि १४ नोव्हेंबर रोजी दिवसाचे तापमान ३६ ते ३७ अंशांच्या दरम्यान होते, मात्र २० नोव्हेंबर रोजी दिवसाचे तापमान ३४.३ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, मात्र दिवसभरातील आर्द्रता आणि उष्मा यामुळे नागरिकांना घाम फुटला आहे.

ज्येष्ठ फिजिशियन डॉ. दीपक बैद म्हणाले की, हवामानातील बदलासोबत रुग्णांची संख्याही वाढत आहे. लोक सर्दी, खोकला, तापाच्या तक्रारी घेऊन येत आहेत. महापालिका आरोग्य विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रत्येक आपला दवाखान्यात दररोज १०० ते १२० रुग्ण येतात. त्यापैकी बहुतेकांना ताप, सर्दी, खोकला यांचा त्रास होतो.

जनरल प्रॅक्टिशनर्स संघटनेचे सरचिटणीस डॉ. जाहिद खान यांनी सांगितले की, व्हायरल फिव्हरचे प्रमाण अधिक आहे. तापासोबतच सर्दी, घसादुखीच्या तक्रारीही नागरिकांमध्ये दिसून येत आहेत. विशेषतः वृद्धांनी जास्त काळजी घ्यावी, असे आवाहन डॉ. खान यांनी केले आहे.

***लहान मुलांनाही फटका***

*बदलत्या हवामानाचा मुलांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे जे. जे. रुग्णालयाच्या वरिष्ठ डॉक्टरांनी सांगितले. ओपीडीमध्ये उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक दोन मुलांपैकी एका बालकाला सर्दी-खोकल्याची तक्रार आहे.*

***ही खबरदारी घ्या***

*✻ गरम पाण्याचे सेवन करा*
*✻ घराबाहेर पडताना मास्क वापरा*
*✻ सर्दी आणि खोकल्याच्या रुग्णांनी मास्क घालणे आवश्यक आहे.*
*✻ संसर्ग टाळण्यासाठी अतिरिक्त खबरदारी घ्या*
*✻ प्रतिकारशक्ती राखण्यासाठी गरम आणि पौष्टिक अन्न खा*

***थंडीची प्रतीक्षा संपली***

*नोव्हेंबरचे तीन आठवडे उलटून गेल्यानंतर शहरी भागातील लोक थंडीची वाट पाहत होते. अखेर ही प्रतीक्षा संपली. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, हिमालयीन भागात बर्फवृष्टीमुळे उत्तर भारतात हवामान थंड आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्येही उत्तरेकडील वाऱ्याचा प्रभाव आहे. नाशिक, अहमदनगरसह अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील काही दिवस किमान तापमान १३ ते १५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. उत्तर महाराष्ट्रातील किमान तापमान १.२६ अंशांवर पोहचले आहे.*

# पनवेलमध्ये दुकानांमधून ५५ मोबाईलची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील मोबाईलचे दुकान फोडून चोरट्याने ५४ नवीन मोबाईल आणि एक जुना मोबाईल असे २३ लाख ९५ हजार रुपये किमतीचे ५५ मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शंकर हजारे हे कोळेश्वर चौक, पनवेल येथे राहत असून त्यांचा पुजारा टेलिकॉम, शॉप नंबर तीन, रिद्धी सिद्धी प्लाझा, उरण नाका, कोळेश्वर चौक, पनवेल येथे मोबाईल विक्रीचा व्यवसाय आहे. १८ नोव्हेंबर रोजी त्यांनी दुकान रात्री साडेदहा वाजता बंद केले. या वेळी काम करणारा मुलगा व ते दोघे घरी गेले. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी सातच्या सुमारास इमारतीमधील वॉचमन त्यांच्या घरी आला व कुणीतरी दुकानाचे शटर तोडले असल्याचे सांगितले. ते तत्काळ दुकानात गेले असता दुकानाचे शटर बाहेर असलेले लोखंडी सेफ्टी गेट व आतील लोखंडी शटरचे सर्व लॉक कापलेले दिसून आले. त्यांनी दुकानात पाहिले असता ५४ नवीन मोबाईल आणि एक जुना मोबाईल असे २३ लाख ९५ हजार १६३ रुपयांचे ५५ मोबाईल चोरीला गेले.

# उरणमध्ये तिरंगी लढत; आज निकाल

**उरण : प्रतिनिधी**

उरण मतदार संघात निवडणूक निकालाची उत्कंठा सर्वच उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उत्कंठा शिगेला पोहचली असून, महायुती भाजपचे उमेदवार महेश बालदी, महाविकास आघाडी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) उमेदवार मनोहर भोईर व शेकापचे प्रितम म्हात्रे या तीन दिग्गज उमेदवारांनी या निवडणुकीत आपापली प्रतिष्ठा पणाला लावली होती.

यंदाच्या या विधानसभा निवडणुकीत एकूण १४ उमेदवारांचे मतदान यंत्रात बंद करण्यात आलेले राजकीय भवितव्य आज बाहेर पडणार आहे. या निवडणुकीत आपल्याच माथ्यावर विजयाचा गुलाल पडणार असल्याचा दावा तिरंगी लढतीतील तिन्ही उमेदवारांनी केला आहे. हे आत्ता काही तासांच्या अवधीत स्पष्ट होणार आहे.

## निवडक

### चिंचपाडा येथे अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी हायवेने कळंबोलीकडे जाणाऱ्या सर्व्हीस रोडकडे वळण्याच्या अगोदर चिंचपाडा गावाजवळ एका अज्ञात वाहनाची धडक मोटरसायकलला बसून झालेल्या अपघातात मोटार सायकलस्वार गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. रविकुमार पुजारा (३० रा.पळस्पे) असे या मयत इसमाचे नाव असून तो ऑफिसच्या कामावरुन घरी जेएनपीटी हायवेने परत येत असताना कळंबोलीकडे जाणाऱ्या सर्व्हीस रोडकडे वळण्याच्या अगोदर चिंचपाडा गावाजवळ त्याच्या दुचाकीस कोणत्यातरी अज्ञात वाहनाने पाठीमागून धडक मारल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मोटरसायकलस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने मोटरसायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील गिरवले फाटा हद्दीत घडली आहे. किशोर सुलताने (३८ रा.उलवे) हे गोवा-मुंबई हायवे रोडने पनवेलकडे येत असताना गिरवले फाट्याच्या हद्दीत त्यांच्या मोटरसायकलला अज्ञात वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात ते जखमी होवून त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशनसमोरील गोल गार्डनमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे आहे. बांधा मध्यम, अंगात काळा टी-शर्ट व लवेंडर रंगाची फुल पॅन्ट, डाव्या हातामध्ये काळे घड्याळ व उजव्या हातात निळा बेल्ट घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहाय्यक निरीक्षक राजेंद्र घेवडेकर (९९२३४४१६८५) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ए.के.शेख यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल :** येथील ज्येष्ठ साहित्यिक ए.के.शेख यांच्या दिव्य कुरआन - मराठी अनुवाद या पुस्तकाचे प्रकाशन ३० नोव्हेंबर रोजी पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे सायंकाळी ४.०० वा. पार पडणाऱ्या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पार पडणार आहे. या वेळी सईद मुल्ला, डॉ. इकबाल मिन्ने, अली एम शम्सी, मुफ्ती मोहम्मद रझी कडवई, डॉ. मोहम्मद अस्लम खान, मोहम्मद जावेद शेख, रोहिदास पोटे हे मान्यवरही उपस्थित राहणार असल्याचे आय के शेख, हमीद शेख, वाय के शेख, डॉ.समीर शेख यांनी कळवले आहे. सदर ग्रंथाचे स्वागत मूल्य ५०० रुपये असल्याचेही सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन नसीमा फाऊंडेशन, पनवेल यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**पनवेल : कोकण मराठी साहित्य परिषदेमार्फत दिला जाणारा मराठी भाषा संवर्धनासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल वामनराव दाते स्मृती उत्कृष्ट कोमसाप शाखा पुरस्कार पनवेल शाखेला मिळाला आहे. पुरस्कार स्वीकारताना अध्यक्ष रोहिदास पोटे, कोषाध्यक्ष काशिनाथ जाधव, सहसचिव, राजकुमार ताकमोघे व कार्यकारिणी सदस्य नागनाथ डोलारे उपस्थित होते.**

# उरणमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**उरण : रामप्रहर वृत्त**



भारतीय नौदलाच्या नेव्ही विक सेलिब्रेशन २०२४ चा एक भाग म्हणून, आयएनएचएस संधानी आणि नेव्हल स्टेशन करंजा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूलच्या पलक मैदानावर आरोग्य शिबिर झाले.

शिबिराचे उद्घाटन सर्जन रिअर डमिरल दिलीप राघवन, कमांडिंग ऑफिसर, आयएनएचएस अश्विनी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी कमोडोर सी रामी रेड्डी, उरण एज्युकेशन सोसायटी युइएसचे अध्यक्ष तनसुख जैन तसेच अन्य सदस्य उपस्थित होते. या शिबिरात उरण आणि आजूबाजूच्या गावातील रहिवाशांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. या वेळी रुग्णांची आरोग्य तपासणी तसेच आरोग्य सल्ला आणि औषधे मोफत देण्यात आली. शिबिरात ५०० हून अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरात शल्यचिकित्सक, स्त्रीरोग तज्ञ, बालरोगतज्ञ, नेत्ररोग तज्ञ, दंतवैद्य आणि त्वचारोग तज्ञ अशा विविध आजारांवरील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णांची तपासणी केली. तसेच या शिबिरात रक्त तपासणी, डोळे तपासणीदेखील करण्यात आली. चष्मेही मोफत देण्यांत आले.

# रसायनीतून आळंदी यात्रेसाठी वारकरी मार्गस्थ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आळंदी येथे २६ नोव्हेंबर रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा आहे. त्यासाठी वारकरी आळंदीकडे मार्गस्थ झाले आहेत.

रसायनी पाताळगंगा परिसरातील दिंड्या बुधवारी (दि.२०) सकाळी आळंदीसाठी मार्गस्थ झाल्या आहेत. दरम्यान, वारकऱ्यांनी मतदान करूनच आळंदीकडे मार्गस्थ झाले. आळंदी यात्रेसाठी रसायनी-पाताळगंगा परिसरातील १२ गावातील वारकऱ्यांच्या दिंड्या वेगवेगळ्या मार्गाने जात असतात. यावर्षी २६ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे यात्रा आहे आणि त्यामुळे या यात्रेसाठी १८ नोव्हेंबरपासून पायी दिंड्या मार्गस्थ झाल्या आहेत. बहुसंख्य पायी दिंड्या या बुधवारी तर काही आळंदीकडे मार्गस्थ झाल्या आहेत.



मोहोपाडा येथील मरिआई मंदिरात परिसरातील १२ गावातील दिंड्या दाखल झाल्या होत्या. त्यावेळी मोहोपाडा ग्रामस्थांनी त्या दिंड्यांचे स्वागत केले व ग्रामपंचायत सदस्य प्रतिक्षा रोशन राऊत, रसिका राकेश खराडे, आकाश जुईकर यांनी आळंदीसाठी रवाना झालेल्या वारकऱ्यांना अन्नदान करून आशिर्वाद घेतले व वारीत सहभागी झाले. सर्व वारकरी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन आळंदीच्या दिशेने रवाना झाले.

# गडदुर्गांवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या जमिनीवर बेकायदेशीररित्या उभारलेला दर्गा, तसेच अन्य अनधिकृत बांधकामे प्रशासनाने जमीनदोस्त केली. शासनाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन निष्कासनाची कारवाई केली त्याविषयी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आभार मानण्यात आले आहे.

अशाच प्रकारचे किल्ले विशाळगड, किल्ले कुलाबा, किल्ले लोहगड, किल्ले वंदनगड, किल्ला शिवडी आदींवर अतिक्रमणे झाल्याचे लक्षात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गड-दुर्गांवरील सर्व अनधिकृत बांधकामे हटवणे आवश्यक आहे. हिंदु जनजागृती समितीने ही सातत्याने मागणी लावून धरल्यामुळे माहीम किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामे हटवण्यात आले; मात्र राज्यातील ३५ महत्त्वाच्या गड-दुर्गांवरील अशी अनधिकृत बांधकामे झाल्याचे स्वत: राज्य पुरातत्त्व विभागाचे म्हणणे आहे. किल्ले प्रतापगड, माहीम किल्ला आणि नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकामे ज्या पद्धतीने हटवण्यात आली, त्याच राज्यातील ३५ महत्त्वाच्या गड-दुर्गांवरील अशी अतिक्रमणे हटवण्यासाठी तातडीने शासनाने पावले उचलावीत, अशी आमची मागणी आहे.

सिडकोच्या जागेवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत दर्गा आणि अन्य बांधकामामुळे नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला, तसेच राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाला होता. वर्ष २०१२ मध्ये चार दगडांना पांढरे आणि हिरवे रंग देण्यात आले होते. झाडाखाली चार पांढऱ्या रंगाच्या दगडांनी कंपाऊंड, कारंजे, घुमट, पाण्याच्या टाक्या, आऊटहाऊस, गेस्ट हाऊस आणि पार्किंग असलेला मोठा दर्गा बनला होता. हे खूपच गंभीर होते. त्याविरोधात समितीने पहिली तक्रार मार्च २०२३ मध्ये, तर दुसरी तक्रार ऑक्टोबर २०२४ मध्ये दिली होती. त्या वेळी हिंदु जनजागृती समितीचे मुंबई जिल्हा समन्वयक बळवंत पाठक, समितीचे महेश लाड आणि पत्रकार विजय भोर यांनी सिडकोच्या दक्षता अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. त्यावर सिडकोकडून कारवाई करण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता.

अनधिकृत बांधकाम निष्कासित करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसराची सुरक्षा सुनिश्चित झाली आहे, त्याप्रमाणे राज्यातील गड-किल्ल्यांवर अनधिकृत बांधकामे हटवून तेथील पावित्र्य आणि संस्कृती आबाधित राखावी, असे समितीने म्हटले आहे.

## संपादकीय

# विरोधकांच्या हाती कोलित

अमेरिकेचा न्याय विभाग आणि अमेरिकी बाजार नियामक मंडळाने भारतीय उद्योगपती गौतम अदानी यांच्याविरोधात लाचखोरीचा आरोप केला असून त्यांच्याविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे तसेच अदानी यांना अटक वॉरंटही बजावण्यात आले आहे. अर्थातच, अदानी समुहाने हे आरोप फेटाळून लावले आहेत, मात्र देशातील मोदी सरकारच्या विरोधकांना, विशेषत: काँग्रेस नेते राहुल गांधी यांना संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी हे आयतेच कोलित हाती लागले आहे.

**अदानी समुहाने २०२१ ते २०२२दरम्यान भारतीय अधिकाऱ्यांना २२०० कोटी रुपयांची लाच दिली असा ठपका अमेरिकेने त्यांच्यावर ठेवला आहे. अमेरिकेचे मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी नियोजित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे सारी सूत्रे सुपूर्द करण्याआधी अदानी यांच्याविरोधातील हे आरोपपत्र येणे अनेक प्रश्न उपस्थित करणारे आहे. दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्याबाबतच्या या वादावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेले आरोप भारतीय जनता पक्षाने गुरूवारी फेटाळून लावले. प्रत्येक वेळी संसदेचे अधिवेशन तोंडावर आले की राहुल गांधी यांच्याकडून अशा प्रकारचे आरोप केले जातात. नुसते आरोप करण्यापेक्षा गांधी न्यायालयात का जात नाहीत, असा प्रतिहल्ला भाजपने त्यांच्यावर चढवला. यापूर्वीदेखील संसद अधिवेशनाच्या तोंडावरच हिंडेनबर्ग अहवाल आला होता. मोदींची विश्वासार्हता नष्ट करण्याचा कितीही प्रयत्न विरोधकांनी केला तरी जनतेच्या नजरेत मोदींची विश्वासार्हता वाढतेच आहे. अमेरिकेचे जे काही आरोप आहेत, त्याचे उत्तर संबंधित उद्योग समूह देईलच, पण यात पंतप्रधानांना ओढण्याचे कारण काय? तसे पाहिले तर, ज्या चार राज्यांत लाचखोरी झाली असे या प्रकरणात म्हटले गेले आहे, त्या ओडिशा (बीजेडी), तामिळनाडू (डीएमके), छत्तीसगढ (काँग्रेस), आंध्र प्रदेश (वायएसआर काँग्रेस) या राज्यांमध्ये त्यावेळी काँग्रेस आणि मित्रपक्षांचीच सरकारे होती. काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री अदानी समुहाशी करार करून गुंतवणूक घेत आहेत, पण तो पैसा पंतप्रधान मोदींकडे जात आहे या आरोपाला काय म्हणायचे? अदानी यांच्या मागे मोदी आहेत तर छत्तीसगड, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी अदानी यांची गुंतवणूक आपल्या राज्यात का येऊ दिली, असा रास्त प्रश्न भाजपकडून करण्यात आला आहे. याचे उत्तर राहुल गांधी देऊ शकतील का? यापूर्वी काँग्रेसविरोधात भ्रष्टाचार प्रकरणांचे जे काही आरोप झाले त्या सर्व प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयांत पुरावे दिले गेले. राहुल गांधी आता तसे का करत नाहीत? भारत अतिशय वेगाने जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हे नेमके कुणाकुणाला खटकते आहे? अमेरिकेने केलेल्या आरोपांमुळे देशातील सुमारे अडीच कोटी छोट्या गुंतवणूकदारांचे नुकसान झाले. संसदेच्या आगामी अधिवेशनातही या प्रकरणावरून विरोधकांकडून गोंधळ घातला जाणार हे अपेक्षितच आहे, परंतु हे आरोप खरे आहेत असे क्षणभर मानले तरी केंद्रीय तपास यंत्रणा संबंधित बिगरभाजप शासित राज्यांतील पक्षप्रमुखांना चौकशीसाठी ताब्यात घेऊ शकतात. काँग्रेसच्या मित्रपक्षांना हे परवडणार आहे का? यापूर्वी दोनदा हिंडेनबर्ग या शॉर्ट सेलरने अदानी समुहाला लक्ष्य केले होते, परंतु दोन्ही वेळा अदानी समुह त्यातून सुरक्षित बाहेर आला हेही या संदर्भात लक्षात घ्यावे लागेल.**

# ग्रंथालयीन सेवा-सुविधांची पूर्तता होणे आवश्यक

जीवनात शिक्षणाचे स्थान अनमोल आहे आणि शिक्षणात ग्रंथालयाचे स्थान अतुलनीय आहे. शिक्षण मानवाला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उच्च पदे प्राप्त करण्यासाठी, जीवनमान उंचविण्यासाठी चांगल्या संधी उपलब्ध करून प्रगतीच्या मार्गावर पुढे जाण्यास प्रोत्साहित करते, मानवी जीवनातील अंधार दूर करण्यासाठी प्रकाश शिक्षणाच्या रूपात आहे. पुस्तके हा शिक्षणाचा आधार आहे आणि चांगल्या पुस्तकांच्या संग्रहाला ग्रंथालय म्हणतात.

ज्ञान स्रोत केंद्र म्हणजेच शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांची ग्रंथालये शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट पूर्ण करण्यात मोठी भूमिका बजावतात. ग्रंथालयाशिवाय शिक्षण संस्था अपूर्ण आहे. आज आपण आधुनिक युगात प्रगत शैक्षणिक संस्था पाहतो, पुस्तकांचे स्वरूपही डिजिटल आणि आभासी झाले आहे, जगभरातील ज्ञान, नवीनतम माहिती, पुस्तके, कागदपत्रे आपल्याला इंटरनेटच्या एका क्लिकवर घरबसल्या त्वरित उपलब्ध होतात. शिक्षणाबरोबरच प्रत्येक क्षेत्रात, सरकारी विभाग, खासगी संस्था आणि समाजातही ग्रंथालयाचे विशेष स्थान आहे. सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, सरकारी विभागीय ग्रंथालय, विशिष्ट विषयाशी संबंधित ग्रंथालय, खासगी ग्रंथालय, आंतरराष्ट्रीय ते स्थानिक स्तरापर्यंत ग्रंथालयांची विविध रूपे आपण पाहतो.

मानवी जीवनातील शिक्षणाचा प्राथमिक स्तर म्हणजे शाळा, जिथे जीवन विकासाचा पाया, नैतिकता, सभ्यता, मूल्ये आणि ज्ञानाची बीजे पेरली जातात, जेणेकरून ते मोठे होऊन हिरवेगार, फलदायी वृक्षाप्रमाणे विकसित होऊन देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. ज्याप्रमाणे कुंभार मातीला विशिष्ट आकार देऊन मौल्यवान बनवतो. त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना विविध विषयांच्या ज्ञानासोबतच, चांगल्या सवयी, प्रामाणिकपणा, एक चांगला माणूस, सक्षम कर्तृत्व आणि सुजाण नागरिक बनण्याची संधी प्रदान करते. शाळकरी मुले विविध विषयांचे ज्ञान पटकन आत्मसात करतात आणि नवीन गोष्टी लवकर शिकतात. अशा शैक्षणिक वातावरणात ज्ञानाचा आत्मा म्हणजेच ग्रंथालय ही शिक्षणाची सर्वात मोठी जबाबदारी पार पाडते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुसज्ज ग्रंथालय अत्यंत महत्त्वाचे आहे.

शिक्षणाचे महत्त्व आपल्या सर्वांना चांगलेच माहीत आहे, भारत सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन देखील शिक्षणात सकारात्मक भूमिका बजावण्यासाठी आणि नवीन यश मिळविण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. शिक्षणाच्या समृद्धीसाठी नवनवीन कार्यक्रम, धोरण राबविण्यात येतात. समग्र शिक्षा अभियानासारख्या अनेक प्रेरणादायी मोहिमा राबवल्या जात आहेत. केंद्रीय विद्यालय संघटन, जवाहर नवोदय विद्यालय, सैनिक स्कूल, स्कूल ऑफ स्पेशलाइज्ड एक्सीलेंस या सारख्या सरकारी शाळा देशातील दर्जेदार शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचप्रमाणे, खाजगी शैक्षणिक संस्थांमध्येही, काही शाळा शासकीय नियम, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानकांचे पालन करून चांगली कामगिरी करतात. येथे उच्च शिक्षित कर्मचारी, नियमित पदभरती आणि शालेय सेवा-सुविधा यांची विशेष काळजी घेतली जाते. ग्रंथालयांच्या विकासाबाबतही विशेष धोरण व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. निश्चितच अशा शाळांमधून हुशार विद्यार्थी घडतात, जे पुढे जाऊन स्वतःचा, शाळेचा आणि देशाचा गौरव करतात, मात्र देशात अशा शाळांची संख्या खूपच कमी आहे.

देशातील अनेक राज्यांतील शिक्षण व्यवस्थेत प्रचंड समस्या असून त्या विकासात अडथळे ठरत आहेत. आजही अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधा नाहीत. वीज, शुद्ध पाणी, क्रीडांगण, क्रीडा साहित्य, प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा आणि भरभराटीचे ग्रंथालय यांचा अभाव आहे. काही ठिकाणी पदे रिक्त आहेत, अनेक पदांवर वर्षानुवर्षे भरती नाही, अनेक ग्रंथालयांमध्ये साहित्यासाठी निधी नाही तर काही ठिकाणी फर्निचर नाही, काही ठिकाणी उद्ध्वस्त होत असलेल्या शाळा इमारती, तर कुठे तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याबाबत अनभिज्ञ कर्मचारी असल्याचे दिसून येते. मोठी शहरे आणि महानगरांमध्ये परिस्थिती काहीशी चांगली आहे, परंतु ग्रामीण भाग आणि दुर्गम मागास भागात शालेय शिक्षण व्यवस्था आणि मूलभूत सुविधांची वानवा आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या पोर्टलवरून प्राप्त माहितीनुसार राज्यातील १११८७९ शाळांमध्ये सध्या २०९८९५७२ विद्यार्थी आहेत. यामध्ये खासगी शाळा ६७८४२, तर खासगी अनुदानित शाळा ४४०३७ आहेत. या दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये एकूण ६८६४९५ कर्मचारी असून त्यापैकी शिक्षक कर्मचारी ६१३१८१, तर शिक्षकेतर कर्मचारी ७३३१४ आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा जीआर जे २८ जानेवारी २०१९ रोजी प्रसिद्ध झाले होते, त्यानुसार खासगी अनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या एकूण १६०० अर्धवेळ ग्रंथपालांच्या सेवानिवृत्तीनंतर ही पदे रद्द करण्यात येतील, असे त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले. एकूण ४४०३७ खासगी अनुदानित शाळांपैकी पूर्णवेळ ग्रंथपालांची केवळ २११८ पदे मंजूर करण्यात आली आहेत. म्हणजे दोन्ही मिळून केवळ ३७१८ ग्रंथालय कर्मचारी कार्यरत आहेत. या जीआरच्या तारखेपासून आतापर्यंत अनेक ग्रंथालय कर्मचारी निवृत्त झालेले असावेत, त्यामुळे ही संख्या आणखी कमी होते. यानुसार महाराष्ट्र राज्य शासनाच्या ४४०३७ खासगी अनुदानित शाळांपैकी ४०३१९ शाळांमध्ये ग्रंथालय कर्मचारी कार्यरत नाहीत किंवा असे म्हणता येईल की, ग्रंथालय सेवेची सोयच नाही. महाराष्ट्र सरकारने १००१पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या हायस्कूलमध्येच ग्रंथपाल पदाचा नियम केला आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे की शाळेतील शिक्षकांच्या पगारावर सरकार दरमहा कोट्यवधी रुपये खर्च करते, परंतु ग्रंथालयाच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याने लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन मूलभूत सेवा सुविधांपासून वंचित आहे.

महाराष्ट्र राज्यातील फार कमी शाळांमध्ये ग्रंथपाल आहेत. मी स्वतःसुद्धा महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित शाळांमध्ये ग्रंथालय पदांसाठी वर्षानुवर्षे भरती पाहिली नाही. शाळांमध्ये ग्रंथपाल नियुक्त करण्याबाबत संबंधित विभाग, प्रशासन, शासकीय अधिकारी उदासीन असल्याचेही स्पष्ट दिसून येत आहे. आश्चर्याची बाब म्हणजे विविध समित्या व आयोगांचे अहवाल, शासन निर्णय आदींनंतरही समृद्ध शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाचे सरकारी शाळांमध्ये ग्रंथपाल नेमण्याचे कोणतेही विशेष धोरण नाही. ग्रंथपालांशिवाय आजच्या शालेय विद्यार्थ्यांचे म्हणजे उद्याचे भावी नागरिकांचे भवितव्य अंधारात असणार. केवळ उच्च माध्यमिक शाळांशी संलग्न असलेल्या शाळांमध्येच ग्रंथपालाची नियुक्ती होऊ शकते, अशी खेदजनक स्थिती प्राथमिक शाळांमध्ये ग्रंथपालांसह ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. शाळेच्या पहिल्या वर्गापासूनच विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवेची सुविधा मिळावी. देशातील एका राज्यातील सरकारी अनुदानित शाळांची ही बाब आहे. सर्वच राज्यातील परिस्थिती पाहिल्यास मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या भयावह ठरू शकते. अशा स्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी बळकट होणार आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशाच्या जोरावर होणार?

शालेय ग्रंथालयाच्या जाहीरनाम्यानुसार प्रत्येक शाळेत पूर्णवेळ पात्र ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. शालेय ग्रंथालय विकास नियोजन आणि व्यवस्था ही महत्त्वाची जबाबदारी आहे. ग्रंथपालांना मदत करण्यासाठी पुरेसा सहायक कर्मचारीवर्ग नेमला जावा. भारतातील बहुतेक शालेय ग्रंथालये पात्र ग्रंथपालांद्वारे चालवली जात नाहीत असाही एक सामान्य समज आहे. जेव्हा ही सर्व ग्रंथालये प्रशिक्षित, कुशल, पात्र ग्रंथपालांद्वारे चालविली जातील, तेव्हा ग्रंथपालपदाची व्याप्ती, आकार आणि शालेय स्थिती बदलेल. एक वचनबद्ध केंद्र आणि राज्य सरकार, मजबूत शालेय ग्रंथालय संघटना, शालेय ग्रंथालयांबाबत राष्ट्रीय धोरण, एलआयएस अभ्यासक्रमात शालेय ग्रंथपालपदाचा समावेश आणि शालेय ग्रंथालयांवर एक मजबूत राष्ट्रीय मिशन असावे.

देशातील अशा शाळांमध्ये ग्रंथालयांची खरी समस्या काय आहे आणि त्यावर उपाय काय असू शकतो हे आपल्या सर्वांना माहीत आहे. समग्र शिक्षा अभियानाच्या यशस्वीतेसाठी आणि सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय विद्यालय संघटनेच्या धर्तीवर दर्जेदार शिक्षण आणि नोकरभरती राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला त्याच्या मूलभूत सुविधा मिळण्याचा अधिकार आहे.

**-डॉ. प्रितम गेडाम**

## बदलते तंत्रज्ञान

# जिओ युजर्सला मिळणार १०० जीबी फ्री स्टोरेज

रिलायन्स जिओने युजर्ससाठी 'जिओ एआय क्लाउड स्टोरेज वेलकम ऑफर' जाहीर केली आहे. युजर्सना




यामध्ये १०० जीबीपर्यंत AI क्लाउड स्टोरेज आणि नवीन AI फीचर्समध्ये मोफत प्रवेश दिला जाणार आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी कंपनीच्या ४७व्या ॲन्युअल जनरल मीटिंगमध्ये अनेक उपक्रमांसह ही 'जिओ एआय क्लाउड वेलकम ऑफर' जाहीर केली होती. त्यानंतर तीन महिन्यांनी ही घोषणा करण्यात आली आहे.

Jio Zo JioCloudच्या ऑफरबद्दल काही निवडक युजर्सना SMSद्वारे सांगण्यास सुरुवात केली आहे. एसएमएममध्ये असे सांगण्यात आले आहे की, Jio कुटुंबातील खास सदस्य म्हणून JioCloud एक्सप्लोर करू शकेल. ऑफरमध्ये एआय मेमरीज, एआय स्कॅनर, डिजीलॉकर यांसारख्या फीचर्ससह जिओक्लाऊडला १०० जीबी फ्री स्टोरेज मिळणार आहे. यानंतर काही लोकांना असेही लक्षात आले की, क्लाउड स्टोरेजची लिमिट १०० जीबी पेल्सज जास्त आहे. म्हणजेच जिओ काही लोकांना १०० जीबी पेक्षा जास्त फ्री स्टोरेज देत आहे. याचबरोबर लोकांना काही नवीन एआय फीचर्स वापरण्याचीही संधी मिळणार आहे, मात्र सध्या ही सुविधा काही निवडक लोकांनाच उपलब्ध आहे.

ॲन्युअल जनरल मीटिंग (एजीएम)दरम्यान मुकेश अंबानी यांनी 'क्लाउड स्टोरेज वेलकम ऑफरची' घोषणा केली की, जिओ युजर्सना त्यांचे फोटो, व्हिडीओ, डॉक्युमेंट्स, इतर डिजिटल कन्टेंट आणि डेटा सुरक्षितपणे सेव्ह व क्सेस करण्यासाठी १०० जीबीपर्यंत मोफत AI क्लाउड स्टोरेज मिळेल. त्यांनी असेही नमूद केले की, ज्यांना अतिरिक्त स्टोरेजची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी जिओ बाजारात सर्वांत परवडणारे शुल्क आकारेल. अंबानी म्हणाले की जिओ एआय क्लाउड वेलकम ऑफर या वर्षीच्या दिवाळीपासून सुरू केली जाईल. या सेवेमुळे क्लाऊड स्टोरेजचा वापर सर्वांना सहज करता येणार आहे.

दरम्यान, रिलायन्स जिओ आणि वॉल्ट डिस्नेच्या डिस्ने स्टार यांच्यातील विलीनीकरणाला आता अंतिम रूप देण्यात आले आहे. त्यामुळे नवीन मनोरंजन प्लॅटफॉर्म सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या संयुक्त उपक्रमान्वये Jio Cinema आणि Jio Hotstar या भारतातील दोन आघाडीच्या OTT स्ट्रीमिंग सेवा एकत्र आल्या आणि परिणामत: Jiostar.com निर्मिती झाली.

# अभिनेते, निर्माते चिंतामणराव कोल्हटकर



## निमित्त

नटवर्य चिंतामणराव गणेश कोल्हटकर यांचा आज स्मृतिदिन. ते अभिनेते व निर्माते होते. चिंतामणराव कोल्हटकर यांचे घराणे नेवरे या रत्नागिरी जिल्ह्यातील गावचे. त्यांचा जन्म तेथेच १२ मार्च १८९१ रोजी झाला. त्यांचे वडील हे वर्तमानपत्र लेखक आणि वक्ते होते. चिंतामण कोल्हटकरांच्या वयाच्या सातव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. लहानपणी अभ्यासात अधिक गती नसल्याचे पाहून काही वर्षे त्यांनी पिढीजात असलेली शेती केली. पुढे सातारा येथे 'तुकाराम' या नाटकात त्यांनी 'मंबाजी'ची भूमिका साकारून (१९०७) रंगभूमीवर प्रवेश केला. नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर याचे बोट धरून ते महाराष्ट्र नाटक मंडळीत आले आणि १९१८मध्ये दीनानाथ मंगेशकर, कृष्णराव कोल्हापुरे यांच्या समवेत स्थापन केलेल्या 'बळवंत संगीत नाटक मंडळी'पर्यंतचा साराच इतिहास मोठा संघर्षमय, रोमांचकारी आणि अद्भूत असाच आहे.

कोल्हटकर १९११मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळीत दाखल झाले आणि पुढच्याच वर्षी ते भरत नाटक मंडळीत गेले. १९१४मध्ये ते किर्लोस्कर नाटक मंडळीत गेले. तेथे त्यांना प्रसिद्धी मिळाली. १९१८मध्ये त्यांनी दीनानाथ मंगेशकरांच्या भागीदारीत त्यांनी बलवंत नाटक कंपनी काढली. त्यानंतर त्यांनी नाट्यक्षेत्रात अनेक प्रकारची कामे केली. कोल्हटकरांनी भूमिका केलेली पुण्यप्रभाव, राजसंन्यास, भावबंधन, इ. नाटके खूप गाजली. वेड्यांचा बाजार हे राम गणेश गडकरी यांचे अपूर्ण नाटक त्यांनी पूर्ण केले.

राम गणेश गडकरी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे, वीर वामनराव जोशी अशा अनेक नामवंत नाटककारांकडून त्यांनी नाटके लिहून घेतली आणि मोठ्या दिमाखात रंगभूमीवर आणली. चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दीनानाथ मंगेशकर यांनी आपल्या बळवंत संगीत मंडळीतर्फे उत्तमोत्तम नाट्यकृती सादर केल्या आणि गद्य आणि पद्य यांचा अपूर्व साक्षात्कार रंगभूमीवर घडवला.

चिंतामणराव कोल्हटकरांनी बळवंत संगीत मंडळीचे बळवंत पिक्चर्समध्ये रूपांतर केले, पण त्यांना या व्यवसायात प्रचंड खोट बसली. कोर्टकचेऱ्या, नामुष्की आणि पदरी आलेले प्रचंड अपयश पाहून आणि आपल्याच कंपनीत नोकर म्हणून काम करावे लागण्यासारखी मानहानी झाल्याने ते चित्रपटव्यवसायतून तावून सुलाखून बाहेर पडले आणि परत नाटकाकडे वळले.

चिंतामणरावांनी पुढे त्यांनी गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीत प्रवेश केला आणि परत नाटकांतून कामे करायला सुरुवात केली. पुढे ते मो.ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनमध्ये गेले. अखेरीस त्यांनी ललित कला कुंज नावाची स्वतःची नाटक मंडळी काढली. या कंपनीनेच पु.ल. देशपांडे यांना उदयास आणले.

कोल्हटकरांनी मराठीबरोबरच हिंदी आणि उर्दू नाटकांतही भूमिका केल्या. पुण्यप्रभाव या नाटकातील त्यांच्या भूमिकेबद्दल त्यांचा मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी सत्कार केला होता. त्यांचे विविधढंगी काम पाहून जवाहरलाल नेहरूंनी त्यांना बहुरूपी म्हणून नावाजले होते. त्यामुळेच चिंतामणरावांनी आपल्या आत्मचरित्राला बहुरूपी हे नाव दिले आहे. जवळजवळ ५० वर्षे त्यांचा रंगभूमीवरील कलाकारांशी कधी नाटककार म्हणून, कधी नट म्हणून, तर कधी दिग्दर्शक म्हणून संबंध येत गेला. २३ नोव्हेंबर १९५९ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचा मुलगा चित्तरंजन कोल्हटकर हेसुद्धा अभिनेते होते.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : येथील तीनशे वर्षांची परंपरा असलेले दत्त मंदिर व सभोवतालचा परिसर द्रोण कॅमेऱ्याद्वारे टिपला आहे शंतनू नाझरे यांनी.**

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात कच्चा लसूण खाण्याचे अनेक फायदे

लसणाचा वापर भारतीय किचनमध्ये वेगवेगळ्या पदार्थांची चव वाढवण्यासाठी केला जातो. लसणाने पदार्थांची चव तर वाढलेच, सोबतच यातील औषधी गुणांमुळे आरोग्यालाही अनेक फायदे मिळतात. तज्ज्ञ हिवाळ्यात कच्चा लसूण खाण्याची आवर्जून सल्ला देतात.



आयुर्वेदानुसार लसणामध्ये अँटीसेप्टीक, अँटी-बॅक्टेरिअल, अँटी व्हायरल आणि अँटी इन्फ्लामेटरी गुण असतात. अशात जर तुम्ही हिवाळ्यात नियमितपणे रिकाम्या पोटी लसणाच्या दोन कळ्या चावून खाव्यात आणि वरून एक ग्लास कोमट पाणी प्यावे. त्यानंतर ३० मिनिटे तुम्हाला काहीच खायचं किंवा प्यायचं नाहीये.

शरीराची शक्ती वाढवण्यासाठी प्रोटीन आणि इतर पोषक तत्व फार गरजेचे असतात. लसणाच्या कळ्यांमध्ये प्रोटीन, कार्ब्स, मॅगनीज, व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन सी, सेलेनियम आणि फायबर असते. त्यामुळे यातून शरीराला भरपूर शक्ती मिळते.

हिवाळ्यात इम्युनिटी कमजोर झाल्याने वेगवेगळे आजार आणि इन्फेक्शनचा धोका असतो. अशात इम्युनिटी वाढवण्यासाठीही लसूण खाल्ला जाऊ शकतो. एका रिसर्चनुसार कच्चा लसूण खाल्ल्याने सर्दी-खोकला अशा सामान्य समस्या लगेच दूर होतात. या प्रक्रियेत एका खास लिक्विडमध्ये कळ्या भिजवून ठेवल्याने २० महिन्यांपर्यंत स्टोर करता येतात.

महिलांच्या तुलनेत पुरूषांना हृदयरोगांचा धोका अधिक राहतो, ज्याचे मोठे कारण म्हणजे हाय ब्लड प्रेशर आहे. नियमितपणे लसणाचे सेवन केल्याने हाय ब्लड प्रेशरच्या औषधासारखा प्रभाव बघण्यात आला आहे.

हिवाळ्यात थंडीमुळे भरपूर लोक कमी पाणी पितात आणि यामुळे पोटात गडबड होते. अशात रिकाम्या पोटी कच्चा लसूण खाल्ल्याने कमजोर झालेलं डायजेस्टिव सिस्टीम बूस्ट होते. अन्न सहजपणे पचते आणि बद्धकोष्ठता दूर होते. ज्यांचे पोट व्यवस्थित साफ होत नाही त्यांनी लसणाचे सेवन करावे.

लसणाचा वापर तुम्ही स्टॅमिना वाढवण्यासाठीही केला जाऊ शकतो. जुन्या काळात ग्रीसमधील खेळाडू या उपायाचा वापर करत होते, जेणेकरून त्यांना थकवा आणि कमजोरी जाणवू नये.

हाडे कमजोर झाली असतील आणि वेदना होत असेल हा उपाय तुम्ही नक्की करू शकता. अनेक शोधात हे आढळून आले आहे की, महिला लसणाचं सेवन करून ऑस्टियोपोरोसिस आणि ऑस्टियो आर्थरायटिसचा धोका कमी करू शकतात.

# रेवदंडा समुद्रकिनारी भटकी कुत्री

## नागरिकांमध्ये भिती; बंदोबस्ताची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्रकिनारी आढळणारी उनाड कुत्रांची मोठी संख्या भितीचे वातावरण निर्माण करणारी आहे, या उनाड कुत्रांचा बंदोबस्त संबधितांनी करावा, अशी मागणी केली जात आहे.

रेवदंडा समुद्र किनारी कुत्रांची मोठी गँग ठिकठिकाणी उभी असलेली दिसते, सकाळी मार्निग अपच्या निमित्ताने समुद्रावर फेरफटका मारताना ही उनाड कुत्री अंगावर भुंकत येत असतात, त्यामुळे हातात काठी घेवूनच मार्निग अपला जावे लागते. समुद्र किनारी गँग करून उभी असलेली कुत्री मनात भिंती निर्माण करते.



रेवदंडा समुद्रकिनारा पर्यटक, पै-पाहूणे तसेच स्थानिक मोठया संख्येने भेट देत आहेत, कुत्रांची वाढती संख्या मात्र येथे भितीचे निर्माण करते, त्यामुळे समुद्रकिनारी फिरणे, धावणे, चालणे यासाठी मोकळेपणा प्राप्त होत नाही. समुद्र किनारी फेरफटका मारताना नित्याने ही उनाड कुत्री अंगावर भुकंत धावून जात असल्याचे चित्र दिसते. सुदैवाने अदयापी समुद्र किनारी कोणालाही कुत्रांनी दंश केल्याचे ऐकण्यात येत नाही, मात्र रेवदंडा समुद्रकिनारी कुत्रांची टोळकी ठिकठिकाणी उभी असतात, विशेषतः सकाळच्या सुमारास ही कुत्रांची टोळकी समुद्र किनारी बांगडत असलेली दिसतात.

या कुत्रांच्या टोळयाची हद्दी ठरलेली असते, तर एखादा दुसऱ्या टोळीचा कुत्रा अथवा कुत्रांची टोळकी हद्द सोडून आल्यावर कुत्रांचे गॅंगवार सुरू होते, त्यामुळे येथून जा-ये करणे नेहमी भितीचे ठरते.



अलिबाग : विधानसभा निवडणुकीसाठी मोठ्या उत्साहात बुधवारी मतदान झाले. आता शनिवारी मतमोजणी होणार असून मतमोजणी केंद्रांवर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# दक्षिण रायगडमध्ये ८५ हजार चाकरमान्यांनी केले मतदान

**महाड : रामप्रहर वृत्त**

दक्षिण रायगडमधील महाड व श्रीवर्धन मतदारसंघातील सुमारे ८५ हजार चाकरमान्यांनी बुधवारी विधानसभेसाठी मतदानाचा हक्क बजावला आहे. खासगी वाहनांनी दाखल झालेले हे चाकरमानी मतदानाचा हक्क बजावून पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत.

विधानसभा निवडणुकांमध्ये दक्षिण रायगडमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात मतदान होते. रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर, माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा, तळा व रोहा या भागातील अनेक नागरिक नोकरी व व्यवसायानिमित्त स्थलांतरित झाले आहेत. यामध्ये श्रीवर्धन व महाड मतदारसंघामधील मतदारांचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे. या तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक गावातील घरे सणासुदीच्या दिवशी उघडली जातात अथवा निवडणूक असेल, तर चाकरमानी मोठ्या प्रमाणात गावी येतात. चाकरमान्यांची मते निर्णायक असल्याने सर्वच पक्ष याकडे लक्ष देऊन असतात. चाकरमान्यांची मते विचारात घेऊन सर्व पक्षांच्या उमेदवारांनी या भागांमध्ये असणाऱ्या मतदारांकरता विशेष बैठका व सभांचे नियोजन केले होते.

बुधवारी (दि.२०) मतदान करण्यासाठी विरार, वसई, नालासोपारा, घाटकोपर, कल्याण, डोंबिवली, ठाणे, तसेच मुंबईतील विविध उपनगरे, सुरत, अहमदाबाद बडोदा या भागातील अनेक नागरिक मतदानासाठी गावात दाखल झाले होते. यासाठी सुमारे दीड हजार बस व इतर खासगी वाहने अनेक वाड्यांवर हे मतदार घेऊन आले होते.

श्रीवर्धन मतदारसंघामध्ये एक लाख ६१ हजार ५६५ मतदारांनी, तर महाड मतदारसंघामध्ये दोन लाख १० हजार १४० मतदारांनी आपला निवडणुकीचा हक्क बजावला. यामध्ये सुमारे ८५ हजार मतदान हे चाकरमानी आहेत. महाड तालुक्यातील १८७ गावांतील, माणगाव तालुक्यातील १८७ गावांतील, श्रीवर्धनमधील ७८ गावे, म्हसळ्यातील ८४ गावे, तळा तालुक्यातील ६८, पोलादपूरमधील ८७, तर रोहा तालुक्यातील १७० गावांतील अशा सुमारे ७३२ गावांतून मतदानासाठी चाकरमान्यांची मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

मतदान केल्यानंतर सायंकाळीच चाकरमान्यांची परतीच्या प्रवासासाठी धावपळ सुरू झाली. त्यामुळे मंगळवार सायंकाळपासून गावांमध्ये वस्तीला असलेल्या खासगी बस पुन्हा आपल्या नियोजित स्थळी रवाना झाल्याचे दिसले.

# दिंड्यांमुळे खोपोली भक्तिमय

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या कोकण दिंड्यांमुळे खोपोली शहरात भक्तीमय वातावरण झालेले पहावयास मिळाले. मुंबई-पुणे महामार्गावर संपूर्ण रस्ता दिंड्यांनी फुलून गेला होता.

खांद्यावर भगवे ध्वज, मुखात हरिनामाचा गजर, यामुळे सारे वातावरण भक्तीमय झाले होते. आलेल्या दिंड्यांचे खोपोली शहरात विविध भागात जोरदार स्वागत करण्यात आले. खोपोली शहरात वारकऱ्यांची विविध भागात मंदिरांमध्ये विश्रांती असते, त्या त्या भागातील ग्रामस्थ दिंड्यांची भोजना सहित सोय करत असते, शुक्रवारी पहाटे निवास असलेल्या सर्व दिंड्यातील वारकरी आळंदीकडे मार्गस्थ झाले. संपूर्ण खंडाळा घाटात वेगवेगळ्या भागातून आलेल्या दिंड्यांमुळे सारे वातावरण घाटात भक्तीमय झालेले पहावयास मिळाले. ज्ञानबा तुकारामच्या गजराने आसमंत दणाणला. सालाबादप्रमाणे यंदाही रायगड जिल्ह्यातील विविध भागातील दिंड्यांचे आगमन झाले. खोपोली शहरातील लव्हेज गावातही ज्येष्ठ कीर्तनकार हभप मारुती महाराज राणे यांच्या दिंडीचे ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले. या दिंडीचे प्रमुख हभप दिलीप महाराज राणे यांचे स्वागत गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ अर्जुन पाटील, राम पाटील, व गुरुकृपा भजनी मंडळाचे प्रमुख हभप प्रकाशबुवा पाटील व सहकारी यांनी पुष्पहार व श्रीफळ देऊन दिंडीचे स्वागत केले.

या वेळी दिंडीतील वारकऱ्यांनी अभंग सादर केला. अल्पवहारानंतर दिंडीचे प्रस्थान आळंदीच्या दिशेने झाले. या वेळी गावातील महिला मंडळ, तरुण वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एमबीबीएसला प्रवेश घेणाऱ्यांचे स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

सरस्वती एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या डॉ. नंदकुमार तासगावकर मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस शिक्षण घेण्यासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या यादवराव तासगावकर शैक्षणिक संकुल चांदई येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

तेथील ऑडितोरियम मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर, संस्थेचे सेक्रेटरी वंदना तासगावकर, संचालिका मृदुल तासगावकर कुलकर्णी, मेडिकल कॉलेज चे डीन डॉ विनायक सबनीस, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशाग्र पटेल, तपण कुलकर्णी, देवेश शेट्टी, पराग ओला, महेश काशीद यांच्यासह प्रशासकीय अधिकारी नागसेन कांबळे, डॉ रमाकांत तरे, झाकीर पठाण, ख्रिस्तोफर आदी उपस्थित होते.

मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी प्रवेश मिळालेले शंभर विद्यार्थ्यांची नावे घेवून व्यासपीठावर बोलावून त्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रथम वर्षे एमबीबीएस विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित स्वागत सोहळ्याला पालकांनादेखील बसण्याची संधी देण्यात आली होती. सुरुवातीला विद्यार्थी प्रतिनिधी आणि चौथा वर्षातील विद्यार्थी गणेश म्हस्के याने आपल्या महाविद्यालयात रॅगिंग होत नाही आणि आपले कॉलेज महाराष्ट्र राज्यात ७५ टक्के पक्ष जास्त गुण मिळविणारे कॉलेज असल्याचे स्पष्ट केले.

# कार्तिकी एकादशीच्या मेळ्यात भाविकांच्या गर्दीची उत्तम व्यवस्था

**रोहे : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशी हा एक महत्त्वाचा सण आहे ज्यामध्ये लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील पंढरपूर येथे येतात. यंदा कार्तिकी एकादशीच्या जत्रेसाठी विविध ठिकाणांहून पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.

मध्य रेल्वेने कार्तिकी एकादशी मेळा-२०२४ च्या यशस्वी व्यवस्थापनात प्रभावी भूमिका बजावली आहे. ज्यामध्ये १० ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पंढरपूरला भेट देणाऱ्या १ लाखाहून अधिक भाविकांची मोठी गर्दी पाहिली.

विभागाने या कालावधीत पंढरपूर स्थानकावर ५७ विशेष गाड्यांव्यतिरिक्त ९८ नियमित गाड्यांचे सुरळीत संचालन सुनिश्चित केले. स्थानकावर एकूण १.०९ लाख प्रवाशांची वर्दळ नोंदवण्यात आली.

मध्य रेल्वेने दर्शनासाठी येणाऱ्या लाखो प्रवाशांना सुरळीत, सुरक्षित प्रवास आणि रेल्वे परिसरात आरामदायी मुक्काम मिळावा यासाठी जोरदार प्रयत्न केले आहेत.

प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये सुधारित प्रवासी सुविधा अंतर्गत मी तुम्हाला मदत करू शकतो का या बूथवर हिंदी, मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. ७ सामान्य तिकीट खिडक्या, १ आरक्षण खिडकी (दोन शिफ्टमध्ये चालवल्या गेल्या) आणि ४ स्वयंचलित तिकीट वेंडिंग मशिन्स (ATVM²) यांनी त्रासमुक्त तिकीट विक्री सुनिश्चित केली.३० तिकीट-तपासणी कर्मचारी आणि २० तिकीट लिपिकांच्या समर्पित टीमने सुरळीत आणि कार्यक्षम कामकाजाची खात्री केली. गर्दीला सामावून घेण्यासाठी दोन जलरोधक निवारे उभारण्यात आले.स्टेशनवर २ डॉक्टर, २ नर्स, २ फार्मासिस्ट आणि ४ सपोर्ट स्टाफसह २४७ वैद्यकीय मदत डेस्क उभारण्यात आला होता. आपत्कालीन परिस्थितीसाठी एक रुग्णवाहिका चोवीस तास तैनात करण्यात आली होती. स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थापनात अतिरिक्त सफाई कर्मचाऱ्यांनी सतत स्वच्छता सुनिश्चित केली.विस्तृत शौचालय सुविधांमध्ये हे समाविष्ट आहे: प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर १० शौचालये (अपंगांसाठी,सामान्य प्रतीक्षालयात ८ शौचालये.फिरत्या भागात २० फिरती शौचालये.सुलभ शौचालयांच्या समन्वयाने ६० शौचालये आणि १८ स्नानगृहांची व्यवस्था. सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ६० आरपीएफ आणि जीआरपी कर्मचारी तैनात. गर्दीचे निरीक्षण आणि व्यवस्थापनासाठी २० सीसीटीव्ही कॅमेरे बसवले. चार भाषांमधील माहिती फलक, ट्रेनचे वेळापत्रक आणि दिशादर्शक चिन्हे ठळकपणे प्रदर्शित. नियमित घोषणांमुळे स्टेशन परिसर आणि पंढरपूर शहरात प्रवाशांना मार्गदर्शन करण्यात मदत झाली. प्रवाशांच्या सोयीसाठी, ९८ नियमित गाड्यांव्यतिरिक्त ५७ विशेष गाड्या चालवण्यात आल्या.सर्व ३ शिफ्टमध्ये नियंत्रण कक्ष चालवण्यासाठी पुरेशा परिचालन कर्मचाऱ्यांना सेवेत आणण्यात आले आणि ट्रेनच्या अडचणीमुक्त कामकाजाची खात्री करण्यासाठी पुरेसा कार्यरत कर्मचारी देखील तैनात करण्यात आला.

गर्दीचे व्यवस्थापन सुव्यवस्थित करण्यासाठी विभागाने राज्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधून काम केले. होल्डिंग एरिया, विशेष ट्रेन्ससाठी स्क्रॅच रेक आणि तात्पुरते वॉटरप्रूफ शेल्टर यासारख्या उपायांनी कार्यक्रमाच्या यशात योगदान दिले.

मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना सुरक्षित, सोयीस्कर आणि समृद्ध प्रवास अनुभव देण्यासाठी वचनबद्ध आहे. कार्तिकी मेळ्याचे आयोजन हे काटेकोर नियोजन आणि निर्दोष अंमलबजावणीसह मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आयोजित करण्याच्या विभागीय संघांच्या समर्पण आणि कार्यक्षमतेचा दाखला आहे.

# माणगाव तालुक्यात कौल चिकनला पर्यटकांची पसंती

## थंडी वाढल्याने माळरानावर रंगताहेत पाट्या

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

सध्या तालुक्यात थंडी चांगली पडली आहे. त्यामुळे माळरानावर पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणावर पार्टीचे आयोजन करण्यात येत आहे. या वेळी तालुक्यात कौल चिकनला सर्वाधिक पसंती दिली जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

अनेक ठिकाणी खवय्यांकडून खास कौल चिकन पार्टीचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये मुंबई, पुण्यातील पर्यटक सहभागी होत असून चुलीवरील चिकनचा आस्वाद घेत आहेत.

खरीपाच्या हंगामानंतर सध्या शेत मोकळे झाले आहेत. त्यातच तालुक्यात थंडीने चांगला जोर पकडला आहे. त्यामुळे गावपातळीवर अनेकांकडून खाद्यपार्टीचे आयोजन करण्यात येत आहे. मुंबई-पुण्यातील खवय्यांकडून खासकरून कौल चिकन पार्टी केली जात आहे. शेतांमध्ये कडधान्य लागवडीचा हंगाम सुरू होत असताना, एका बाजूला कौल चिकन पार्टीसाठी दगडांच्या चुल्ही मांडल्या जात आहेत. या चुल्हीवरील कौलावर चिकन भाजून त्यावर ताव मारला जात आहे. लाकूड फाटा जाळून पारंपरिक पद्धतीने कौलांचा वापर करून तयार केलेले चिकन खाण्यासाठी अतिशय चवदार लागते.

पहिल्यांदा कौलाला चांगले स्वच्छ करून घेतले जाते. चवीनुसार मीठ मसाला लावून चिकनचे तुकडे एक ते दोन तास मुरत ठेवावे लागते. त्यानंतर चुलीवर ठेवलेल्या कौलावर मीठ मसाला लावून चिकन चांगले भाजून घेतले जाते. कौलावर चिकन भाजताना सर्व बाजूंनी ते भाजले जाईल, याची काळजी घ्यावी. भाजून झाल्यावर चिकन कौल खाण्यासाठी तयार होते. साध्या पद्धतीने तयार होणार कौल चिकन खाणे म्हणजे एक वेगळा आनंद असतो, असे चिकनप्रेमी अभिलाष दळवी यांनी सांगितले.




**PUBLIC NOTICE**

It is hereby informed to the public at large that the landed property described below, is situated within the limits of the Raigad District, Khalapur tahsil and Village Vanvathe is Agricultural Land owned and possessed by Mr.Krushna Hari Kadam.

| S.No. | Survey No. | Area R.Sq.Mtr | Assessment |
|---|---|---|---|
| 1 | 2/1 | 0-78-90 | 3.94 |
| 2 | 2/2 | 0-35-90 | 1.19 |
| 3 | 2/4 | 0-05-00 | 0.37 |
| 4 | 4/1 | 1-30-90 | 7.5 |
| 5 | 4/4/A | 0-11-00 | 1 |
| 6 | 6/1 | 0-14-00 | 0.17 |
| 7 | 6/2 | 0-06-00 | 0.08 |
| 8 | 6/3 | 0-17-00 | 0.18 |
| 9 | 6/4 | 0-04-00 | 0.05 |

That the negotiations about the purchase of the said Land are going on between my Client Mr. Pahadsingh Peersingh Dahiya, Mr. Jayanti Khangararam Purohit, Mr. Jetharam Velaram Purohit and the above named owner. That, this Notice is issued to know about any dispute OR encumbrance of a Private Party/ Bank/ Credit Society, before concluding any transaction about the property described above.

So, it is hereby informed to all that any person claiming any sort of right including Gift, Mortgage, Agreement to sale, Easementary right, Premptory right, charge of a Loan, Charge as a Guarantor or a Charge of a Maintenance or any other right AND is in terested to offer objection to the intended sale, shall submit the same in writing to the undersigned, within 14 days from the date of publication of this notice. If no such objection is raised within such time, my client will conclude the negotiations and complete the sale transaction AND the objection raised thereafter will not be considered.

Place: Rees
Dated:22/11/2024

sd/-
Adv.Umesh D.Pawar Gokul Nagari Building, 107, 1st Floor, Village: Rees. Post-Mohopada,Tal-Khalapur, Dist-Raigad -410222
Mob:7387777697

Mr.Krushna Hari Kadam


# मुलीला पळवून नेल्याची तक्रार

**महाड :** येथील एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची तक्रार महाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

सोमवार ११ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास एका अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले आहे. या बाबतची तक्रार मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात केली आहे. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याचे प्रमाण वाढले असल्याने अशा अनेक तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल होत आहेत.


URGENT WALK-IN INTERVIEW FOR TEACHING AND NON-TEACHING STAFF

RSPM's
Ajanta International School, Taloja & Siddharth Multipurpose Residential High School, Kharghar, Navi Mumbai

VACANCIES AVAILABLE

Teaching Staff in : Science, Mathematics, and Computer Science, Language (English) & Social Science
Non-Teaching Staff positions : Computer Operator (English, Marathi) I Peon Cum Security

QUALIFICATIONS REQUIRED

Teaching Staff : As per CBSE and SSC board requirements. Candidates fluent in English and competent in Marathi and Hindi will be preferred.
Non-Teaching Staff : Candidates with relevant qualifications and experience are preferred; retired professionals with experience will also be considered

WALK IN INTERVIEW DETAILS

- School Timing: Morning 7:00 AM to 6:00 PM
- Salary: As per Government rules
- Date: Monday, 24 November 2024 to Friday, 27 November 2024
- Time: During official hours

SUPARAK BHAVAN, Plot No-52, Sector-19, Kharghar-410210, Panvel



URGENT WALK-IN INTERVIEW FOR TEACHING AND NON-TEACHING STAFF

RSPM's
SATYAGRAHA COLLEGE
Affiliated to Mumbai University
Web : www.satyagrahcollege.com E-Mail : satyagrahacollege@yahoo.com

VACANCIES AVAILABLE

Teaching Staff in : Economics I B.M.S. (Finance) I B.Sc. (Information Technology) B.Sc. (Computer Science) I B.Sc. (Hospitality Studies)
Non-Teaching Staff positions : Computer Operator (English, Marathi) I Peon Cum Security

QUALIFICATIONS REQUIRED

Teaching Staff: Postgraduate in the relevant subject with professional qualifications (NET/SET/Ph.D.). Fresh Postgraduates may also apply if professionally qualified candidates are not available.
Non-Teaching Staff: Candidates with relevant qualifications and experience are preferred; retired professionals with experience will also be considered.

WALK IN INTERVIEW DETAILS

- Class Timing: Morning 8:00 AM to 6:00 PM
- Salary: As per Mumbai University / UGC / Government of Maharashtra Circulars
- Date: Monday, 24 November 2024 to Friday, 27 November 2024
- Time: During official hours

Suparak Bhavan, Plot No-52, Sector-19, Kharghar-410210, Panvel I Mob.: 9930958025

# वातावरणातील बदलामुळे सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील काही दिवसांपासून हवामानात होणाऱ्या बदलामुळे शहरात ताप व सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढल्याचे चित्र आहे. दुपारी कडक ऊन; तर रात्री हवेतील गारवा, पुन्हा पहाटेच्या सुमारास थंडी असे वातावरण अनेकांच्या प्रकृतीवर परिणामकारक ठरू लागले आहे. त्यामुळे खासगी व महापालिकेच्या रुग्णालयांत रांगा वाढल्या आहेत.



सध्या शहरात हवा प्रदूषणदेखील वाढले आहे. त्यामुळे शहरात मध्यवर्ती असलेल्या वाशी येथील महापालिकेच्या रुग्णालयातही वाढ झाली आहे. याशिवाय खासगी रुग्णालयातदेखील रुग्णांच्या रांगा लागल्या आहेत. नवी मुंबई शहरात मागील काही दिवसांत वातावरणात सातत्याने बदल होताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे लहान मुले, तसेच ज्येष्ठ नागरिक आजारी पडण्याच्या संख्येतही वाढ झाली आहे. मॉर्निंग वॉक करणाऱ्यांची संख्याही नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांनाही या समस्यांचा सामना करावा लागत आहे. सकाळी व सायंकाळच्या वेळी हवेत बदल होत असल्याने अचानक थंडीही जाणवत आहे.

दिवसा पडणाऱ्या कडक उन्हामुळे कामानिमित्ताने घराबाहेर निघणाऱ्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत, मात्र रात्रीच्या वेळी बोचरी थंडी जाणवत असल्यामुळे नागरिकांना एकाच दिवसामध्ये दोन ऋतू अनुभवायला मिळत आहेत. त्याचा परिणाम प्रकृतीवर होत असल्यामुळे अनेक जण सर्दी, तापाने ग्रासले आहेत. त्यापैकी अनेकांना घशाचा त्रास जाणवत आहे. अशातच शहरातल्या अनेक विभागांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामध्ये खाडीलगतच्या भागांचा अधिक समावेश आहे.

### डासांचा प्रादुर्भाव

खारफुटीमध्ये वाढलेले डास संध्याकाळच्या वेळी लोकवस्तीमध्ये घुसत असल्यामुळे डेंगी, मलेरियाची साथ पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळे रुग्णालयांत रांगा दिसत आहेत. डासांचा प्रादुर्भाव वाढत असताना पालिकेच्या आरोग्य विभागाकडून वेळेवर धुरीकरण होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. विशेषत्वाने उद्यानालगतच्या रहिवासी भागात संध्याकाळच्या वेळी डासांचा त्रास जाणवत आहे. त्यामुळे अशा ठिकाणच्या रहिवाशांकडून धुरीकरणाची मागणी होत आहे.

**सध्या ऋतूमानानुसार वातावरणात बदल घडत असतात. मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्यांनी सूर्य उगवल्यावर जावे व स्वतःची काळजी घ्यावी, ज्यामुळे त्रास कमी होईल. सर्दी, ताप, खोकल्याच्या रुग्णांमध्येदेखील वाढ झाली आहे. वातावरण स्थिर झाल्यावर हा त्रास कमी होऊ शकेल.**
**-डॉ. प्रतिक तांबे, जनरल फिजिशिअन**

# नवी मुंबईत अपघातांचे सत्र सुरूच

## वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाण्याहून बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकने रस्ता ओलांडून जाणाऱ्या एका ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला धडक दिली.

ट्रकने वृद्धाला काही अंतर फरपटत नेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी दुपारी ठाणे-बेलापूर मार्गावरील रबाळे येथे घडली. या अपघातानंतर पळून गेलेल्या ट्रकचालकाला रबाळे एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे.




या अपघातात मृत झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव तुकाराम एकनाथ तुळजापुरे (वय६९) असे असून ते रबाळे येथील भीमनगरमध्ये राहत होते. बुधवारी दुपारी तुळजापुरे हे आपल्या कामानिमित्त रबाळे येथे गेले होते. त्यानंतर दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास ते आपल्या घरी परतत होते. दरम्यान, ते ठाणे-बेलापूर मार्गावरील रबाळे येथील सिग्नलजवळून रस्ता ओलांडून भीमनगर येथे जात होते.

या वेळी ठाण्याहून बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकने तुळजापुरे यांना धडक दिली. ट्रकचालकाने ट्रक न थांबवता तसाच पुढे नेल्याने तुळजापुरेदेखील काही अंतर ट्रकसोबत फरपटत गेले. यात तुळजापुरे हे गंभीर जखमी होऊन पडल्यानंतर ट्रकचालकाने पलायन केले. रबाळे एमआयडीसी पोलिसांना या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी तुळजापुरे यांना रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेनंतर पोलिसांनी या अपघातातील पळून गेलेला ट्रकचालक कुलदीप राम खिलावन (वय २३) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## घरातून चार मोबाईल चोरले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घराच्या गॅलरीचे खिडकीतून आत प्रवेश करून चार मोबाईल आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी चार अनोळखी व्यक्तीविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अफफान मोहम्मद अयुब खान बुबेरे हे तळोजा पाचनंद, ओवे रोड येथे राहत असून १६ नोव्हेंबर रोजी ते घरात झोपले होते. १७ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास त्यांना जाग आली असता त्यांना एक मुलगा बाहेर जाताना दिसला. त्यांनी पाठलाग केला असता यावेळी त्याने घराच्या गॅलरीतून खाली उडी मारली. त्या अनोळखी मुलाबरोबर इतर तीन व्यक्ती पळताना दिसले.

बुबेरे घराच्या खाली येऊन गेटवर आले असता चारही व्यक्ती पळून गेले. त्यावेळी त्यांच्या आणि काकांच्या घरातून चार मोबाईल, पंचवीस हजार रुपये रोख रक्कम अशी चोरीला गेले.

# किरकोळ बाजारात कांद्याने गाठली शंभरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कांद्याच्या भावाने किरकोळ बाजारात शंभरी गाठली आहे. ग्राहकांसाठी कांद्याची वाढलेली किमत चिंता वाढवणारी ठरली आहे. सध्या किरकोळ बाजारात प्रतिकिलो १०० रुपयांपर्यंत कांदा पोहचल्याने सर्वसामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले आहे.

जुन्या कांद्याच्या किमतीत झालेली वाढ ही मागील काही आठवड्यांपासून होत असलेल्या कमी पुरवठ्यामुळे झाली असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. वाशीतील एपीएमसीत येणारा कांदा नवीन असून काहीसा ओलसर आहे. जुना कांदा सुकलेला असल्याने ग्राहकांकडून जुन्या कांद्याला मोठी मागणी असते, परंतु सध्या सुकवलेल्या कांद्याचा एपीएमसी बाजारात तुटवडा जाणवत असल्याने कांद्याचे भाव वाढल्याचे व्यापारी सांगत आहेत. गुरुवारी (दि.२१) एपीएमसीच्या कांदा-बटाटा बाजारात एकूण १५७ गाड्यांमधून २५, ४२० गोणी कांद्याची आवक झाली.

या वेळी कांद्याचे भाव ४५ ते ६५ रुपये किलो इतके होते; तर नवीन कांदा ३० ते ५५ रुपये प्रतिकिलोने विकला जात आहे, मात्र हे भाव घाऊक बाजारातील असून याचा मोठा परिणाम किरकोळ बाजारावर झाला आहे. नवी मुंबईच्या किरकोळ बाजारात काही ठिकाणी कांदा ८० ते ८५ रुपये किलो; तर काही ठिकाणी १०० रुपये किलोपर्यंत विकला जात आहे.



**पुढील काही दिवसांत कांद्याच्या भावात आणखी वाढ होऊ शकते. सध्या बाजारात सुकलेला कांदा येण्यास विलंब लागत असल्याने कमी प्रतीचा कांदा जास्त भावाने विकावा लागत आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीचा कांदा बाजारात येईपर्यंत हे भाव चढेच राहतील.**
**-मनोहर तोतलानी, कांदा-बटाटा व्यापारी**

हीच परिस्थिती मुंबई आणि ठाणे परिसरातदेखील आहे. यामुळे ग्राहकांना चांगलाच फटका बसला आहे. कांद्याच्या वाढत्या किमतीमुळे नागरिकांनी आपल्या दैनंदिन आहारातून कांद्याचा वापर कमी केला आहे. वाढलेल्या किमतीचा परिणाम घराच्या बजेटवरदेखील झाला असल्याचे अनेकांनी सांगितले.

# कोपरखैरणेत कराटे पंच, प्रशिक्षक परीक्षा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे येथे १ डिसेंबरला कराटे राष्ट्रीय पंच, प्रशिक्षक परीक्षा व शिबिर होणार आहे. ही परीक्षा कराटेची सर्वात कठीण परीक्षा म्हणून ओळखली जाते. कोपरखैरणे येथे प्रथमच राष्ट्रीय पंच परीक्षा होत आहे.

या परीक्षेचे आयोजन सिको काई कराटे महाराष्ट्र या संघटनेमार्फत केले जात आहे. संघटनेच्या अध्यक्ष दीपाली सुर्वे यांनी देशातील जास्तीत जास्त प्रशिक्षकांनी या परीक्षेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. कराटे असोसिएशन महाराष्ट्र व वर्ल्ड कराटेच्या पंच, कराटे इंडिया ऑर्गनायझेशनच्या संयुक्त मुख्य सल्लागार शाहीन अख्तर यांच्याद्वारे या परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

या परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कराटे इंडिया ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष भारत शर्मा, कराटे असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष सल्लाउद्दीन अन्सारी व जनरल सेक्रेटरी संदीप गाडे यांनी शुभेच्छा दिल्यात.

# वावेघर येथून मुलगी बेपत्ता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीतून वावेघर येथून १३ वर्षीय कुमारी गौरी रमेश गुप्ता ही मुलगी हरवली असून अद्यापपर्यंत मिळाली नाही.



कोणास आढळल्यास तत्काळ रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक प्रमोद हंबीर ९८५०१४४१००, सचिन चौरे ९९६०८१९८९८ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन रसायनी पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.



पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अनिवाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, चिटणीस यतीन पाटील, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, राम पाटील, एकनाथ देशकर, दशरथ म्हात्रे, बळीराम पाटील, कुंडेवहाळचे माजी सरपंच सदाशिव वास्कर, सरपंच सीताराम चौधरी, प्रमोद भिंगारकर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विद्याधर जोशी, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, शहर अध्यक्ष अनिल भगत, युवा मोर्चाचे दिनेश खानावकर, सुनील पाटील, माजी उपसरपंच सचिन पाटील, संतोष पाटील, किसन पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, राजेश पाटील, शांताराम पोपेटा, सुनील पाटील, डॉ. संतोष आगलावे, दशरथ म्हात्रे, मयुर कदम, शुभ पाटील, अंकुश पाटील, रहीम लदाप आदींनी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, शेलघर येथील त्यांच्या निवासस्थानी कुटुंबियांनी औक्षण करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, सुहास भगत, योगिता भगत, विश्वानाथ कोळी यांनीही अरुणशेठ भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# ना. आदिती तटकरेंच्या विजयाचे बॅनर

## ◆ माणगावमध्ये निकालापूर्वीच अभिनंदन करून शुभेच्छा

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, आरपीआय, मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांच्या विजयाचे बॅनर निकालाच्या दोन दिवस आधीच माणगाव तालुक्यात झळकले आहेत. त्यांच्या अनेक चाहत्यांनी निकाल लागण्याअगोदरच घासून नाही ठासून येणार या मथळ्याखाली अभिनंदनाचे बॅनर माणगाव तालुक्यात ठिकठिकाणी लावले असून हे बॅनर सर्वांचे वेधून घेत आहेत.




विधानसभा मतदारसंघाची निवडणूक २० नोव्हेंबर रोजी शांततापूर्ण वातावरणात व उत्साहात पार पडली. या निवडणुकीसाठी श्रीवर्धन मतदारसंघातून महायुतीकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आदिती तटकरे, महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अनिल नवगणे, काँग्रेस पुरस्कृत अपक्ष उमेदवार राजेंद्र ठाकूर, मनसेचे उमेदवार फैसल पोपेरे, बहुजन समाज पार्टीच्या उमेदवार अश्विनी साळवी, बळीराज सेनेचे उमेदवार कृष्णा कोबनाक, अपक्ष उमेदवार युवराज भुजबळ, अश्रफ पठाण, संतोष पवार, मोहम्मद काशीम, बुरहाउद्दीन सोलकर व अनंत गीते असे ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. या उमेदवारांचे भवितव्य २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदानानंतर मतदानयंत्रात बंद झाले असून शनिवारी (दि.२३) श्रीवर्धन येथे सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणाऱ्या मतमोजणीनंतर या उमेदवारांचे भवितव्य स्पष्ट होणार आहे.

श्रीवर्धन मतदारसंघात तटकरे कुटुंबीयांची विशेष ताकद असल्याने मंत्री आदिती तटकरे यांचा विजय निश्चित मानला जात असून त्यांच्या विजयावर केवळ शिक्कामोर्तब होणे बाकी असल्याचे मतदारसंघात सर्वत्र ऐकावयास मिळत आहे. आदिती तटकरे जास्तीत जास्त किती मताधिक्याने निवडून येणार याकडे मतदारसंघातील त्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह सर्वांचेच लक्ष लागून आहे. माणगाव नगरीत अदिती तटकरे यांचे अनेक ठिकाणी विजयाचे बॅनर्स झळकले असून अनेकांनी आदिती यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे निकालापूर्वीच अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुरूड तळामार्गे पुणे एसटी बस सुरू करण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड आगारामार्फत काही महिन्यांपूर्वी मुरूड तळामार्गे माणगाव, ताम्हिणीमार्गे पुणे स्वारगेट ही गाडी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आली होती. या गाडीचा फायदा तंत्र विद्यालयात शिकणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना होत होता. याशिवाय तळा व माणगाव तालुक्यातील नागरिकांनासुद्धा ही गाडी आवश्यक वाटत असतानाच ती मागील काही दिवसांपासून अचानक बंद करण्यात आली. त्यामुळे प्रवासी व विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले आहेत.

पुणे येथे हा जवळचा मार्ग असल्याने सर्व प्रवाशांना झटपट पुण्यात पोहचता येत होते, पण गाडी बंद केल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

याबाबत मुरूड आगारात विचारणा केली असता मुरूड-पुणे गाडी लवकरच म्हणजे २५ नोव्हेंबरपासून पुन्हा सुरू करणार असल्याची माहिती वाहतूक निरीक्षक भोसले यांनी प्रस्तुत प्रतिनिधीला दिली.



## चौक बाजारपेठेत वाहतूक कोंडी

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेत होत असलेली वाहतूक कोंडी सोडवण्यास स्थानिक पातळीवर प्रशासन कमी पडले असल्याचे सतत दिसून येते. या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

चौक बाजारपेठेतील रस्ता हा पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग आहे. चौक बायपास होईपर्यंत याच रस्त्याने अवजड वाहतूक सुरळीत होत होती. यापूर्वीची दळणवळण साधने अवाढव्य होती, दोन गाड्या सरळ मार्गक्रमण करीत होत्या, पण गेली काही वर्षे वाढलेले वाहनांचे प्रमाण, त्यांची बेशिस्त पार्किंग, दुचाकीवर बसून खरेदी करणे आणि सर्वात महत्त्वाचे की रस्ता आणि गटार यांच्यावर झालेले अतिक्रमण यामुळे वाहतूक कोंडी होते. येथे वाहतूक पोलिसांची नेमणूक नाही. त्यामुळे चौक येथे कमी पोलीस दलात त्यांनाही तारेवरची कसरत करावी लागत आहे.

राज्य परिवहन विभागाची बसगाडी बायपास जात असल्याने तेवढाच एक दिलासा; अन्यथा बाजारपेठेतून फिरणेदेखील शक्य नव्हते. तुपगावमार्गे रसायनी भागात जाणारी वाहतूकदेखील जास्त झाली आहे. त्यातच गावठी भाजीपाला विक्रेत्यांची बसण्याची सोय होत नसल्याने पोटापाण्यासाठी रस्त्याच्या कडेला जीव धोक्यात घालून बसतात.

मोठी बाजारपेठ आणि सर्वच प्रकारचे बांधकाम साहित्य, बँक, किराणा दुकाने, दवाखाने, भाजीपाला, मटण, चिकन, मच्छी यांची दुकाने, इलेक्ट्रिक, हार्डवेअर दुकाने, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात, रोजची गिऱ्हाईक यामुळे वाहतूक कोंडी होत आहे.

## कर्जतमध्ये मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाली असून या वेळी मतमोजणी प्रशासकीय भवनातील पहिल्या मजल्यावर होणार आहे. यापूर्वी मतमोजणी विविध ठिकाणी घेण्यात आली होती.

या मतमोजणीसाठी टेबलची संख्या १४ व एकूण फेऱ्यांची संख्या २६ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक २३, सहाय्यक २९, सूक्ष्म निरीक्षक २३, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) २१, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) १०६, चतुर्थ श्रेणी कर्मचारी ११९, तर मतमोजणीसाठी निरीक्षक म्हणून जगदीप धंदा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतमोजणीला शनिवारी (दि. २३) सकाळी ८ वाजता सुरुवात होणार असून दुपारी दोन वाजेपर्यंत निकाल अपेक्षित आहे. कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे.

## कर्जतमध्ये कौल कोणाला? उत्सुकता शिगेला

**माथेरान : प्रतिनिधी**

अवघ्या देशाचे लक्ष लागून राहिलेली राज्यातील विधानसभा निवडणूक चुरशीची झाली. या निवडणुकीची मतमोजणी शनिवारी (दि. २३) होऊन राज्याचा कारभारी कोण हे ठरणार आहे. कर्जत विधानसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार, येथे जनता कोणाला कौल देणार याची उत्कंठा माथेरानमध्ये शिगेला पोहचली आहे.

कर्जत-खालापूर विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात एकूण नऊ उमेदवार उभे होते, मात्र खरी लढत तिरंगी झाल्याचे पहावयास मिळाले. यामध्ये महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे, महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत व अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्यामध्ये कांटे की टक्कर झाली असल्याचे येथे बोलले जात आहे. महायुतीचे उमेदवार आमदार थोरवे व महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांना येथे अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांचे मोठे आव्हान असल्याची चर्चा येथील राजकीय वर्तुळात सुरू आहे. आमदारकीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याची चर्चा मागील दोन दिवसांपासून सुरू असून शनिवारी त्या चर्चांना पूर्णविराम मिळणार आहे. प्रत्येक कार्यकर्ता आपल्या नेत्याचा विजयी गुलाल उधळण्यासाठी तयार झालेला दिसत आहे. या निकालाच्या आधारावरच पुढे होणाऱ्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे गणित अवलंबवून असणार असल्याचेदेखील बोलले जात आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभेसाठी सर्वत्र मतदान टक्का वाढलेला दिसत आहे. राज्यभरातून महिलांचे मतदान जास्त प्रमाणात झाले असून माथेरानमध्येही महिला मतदानाचा टक्का वाढलेला आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजना महायुतीच्या विजय सोपा करेल का, अशी चर्चा येथील राजकीय वर्तुळात सुरू आहे.

माथेरानमधून अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्या विजयासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी खूप मेहनत घेतली असल्याचे सर्वांनी पाहिले आहे. घारे हेच येथे विजयी होणार असल्याचे सूतोवाच नेतेमंडळी करीत आहेत. कर्जत येथील प्रशासकीय भवनात मतमोजणी होणार असून येथे नेमका गुलाल कोणत्या नेत्याचा उधळला जाणार, कोण निवडणूक जिंकणार, कर्जत खालापूर तालुक्यातील जनता नेमका कौल कोणाला देणार याची उत्कंठा शिगेला पोहचली आहे.

# पाली हट्टाळेश्वर चौकात पाण्याची गळती

## शेकडो लिटर पाणी वाया; अपव्यय थांबवण्याची मागणी





**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली नगरपंचायत येथील हट्टाळेश्वर चौकात गेल्या एक महिन्यापासून पाण्याच्या पाईपला गळती लागल्यामुळे शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही परिस्थिती जैसे थे आहे.

प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे पाणी वाया जात असून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने यावर त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे तसेच भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी योग्य नियोजन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

सद्यस्थितीत पाणी गळतीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलणे आवश्यक आहे. नागरिकांच्या तक्रारींना गांभीर्याने घेऊन पाणी गळती दुरूस्त करण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## मंत्री आदिती तटकरे ५० हजारांहून अधिक मताधिक्याने निवडून येतील : महम्मद मेमन

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून महायुतीकडून निवडणूक रिंगणात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे ५० हजारांहून अधिक मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष महम्मद मेमन यांनी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना व्यक्त केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाची निवडणूक २० नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडली. या निवडणुकीच्या निकालाबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष महम्मद मेमन यांनी सांगितले की, या मतदारसंघातील श्रीवर्धन, म्हसळा, रोहा, तळा, माणगाव या पाचही तालुक्यात तटकरे कुटुंबीयांनी मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली आहेत. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी माणगाव-रोहा विधानसभा मतदारसंघ असताना माणगाव, रोहा, तळा या तीन तालुक्यांचा विकास केला. नंतरच्या काळात सन २००९मध्ये या मतदारसंघाची पुनर्रचना होऊन नवीन श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाची निर्मिती झाली. या मतदारसंघात २००९मध्ये सुनील तटकरे निवडून आल्यावर त्यांनी मतदारसंघातील विकासकामांपासून वंचित राहिलेल्या म्हसळा व श्रीवर्धन तालुक्याचाही विकास केला.

खासदार तटकरे पहिल्यांदा लोकसभेवर निवडून गेल्यावर २०१९मध्ये आदिती तटकरे यांना श्रीवर्धन मतदारसंघाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी मिळून तेव्हा त्या ३९ हजार ६४१ इतक्या मताधिक्याने निवडून आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी मतदारसंघात गेल्या पाच वर्षात विकासकामांची गंगा आणली. त्याचबरोबर महायुतीच्या सरकारमध्ये आदितीताईंना राज्याच्या महिला व बालविकासमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात आलेली मुख्यमंत्री माझी लाडकी लाडकी बहीण योजना राज्यात सर्वत्र प्रभावी ठरली. श्रीवर्धन मतदारसंघातील सन २०२४ची आदितीताईंची निवडणूक त्यांच्या लाडक्या बहिणींनी हातात घेतली होती. हे चित्र मतदारसंघात सर्वत्र प्रचाराच्या निमित्ताने फिरत असताना दिसत होते. मतदारसंघात प्रचारादरम्यान आदिती तटकरे यांना मिळालेले पाठबळ पाहता त्या निवडणुकीत ५० हजारांहून अधिक मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास मेमन यांनी व्यक्त केला.

# गेल इंडिया लि.तर्फे बामणगाव येथील मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल इंडिया लिमिटेड, उसरच्या वतीने कोएसोच्या बामणगाव येथील रामभाऊ मोरेश्वर पाटील हायस्कूल येथील मुलींसाठी पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

स्वसंरक्षण स्वयंसिद्धा शिबिर कंपनीचे पीडीएचपीपी प्रोजेक्ट मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता, मुख्य प्रबंधक शितल लाकरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून उद्घाटन रामभाऊ मोरेश्वर पाटील हायस्कूलच्या प्रभारी मुख्याध्यापिका उर्मिला संभाजी घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी नंदकुमार गोंधळी, सहाय्यक शिक्षिका सुरेखा श्रीकृष्ण झोपे, स्नेहल संतोष पालकर, अनिल तुकाराम पाटील, नाशिकेत गजानन पेढवी, निता विलास डोळस, मिरा रिनेश गावित, वैशाली भालचंद्र वर्तक, स्वयंसिद्ध प्रशिक्षिका प्रणाली तळेगावकर, हर्षाली नागावकर, वेदिका लाडगे आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रभारी मुख्याध्यापिका उर्मिला घरत यांनी उपस्थित विद्यार्थिनींना शुभेच्छा देत स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले व प्रिझम सामाजिक विकास संस्थेस शुभेच्छा दिल्या, तर तपस्वी गोंधळी यांनी या पाच दिवसाच्या स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरामध्ये कशा प्रकारे प्रशिक्षण दिले जाणार आहे याविषयी सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणात बहुसंख्य विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.







# भारतानंतर ऑस्ट्रेलियाचीही घसरगुंडी

## पर्थ कसोटीच्या पहिल्या दिवशी गोलंदाजांचा बोलबाला

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉर्डर-गावसकर चषक स्पर्धेतील पहिला सामना पर्थमध्ये खेळवला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला असून भारत पहिल्या डावात १५० धावा करत सर्वबाद झाला. यानंतर भारतीय गोलंदाजांनी कांगारू फलंदाजांचे कंबरडे मोडले. ऑस्ट्रेलियाने पर्थमध्ये कसोटीत पहिल्या डावात ७ बाद ६७ विकेट गमावल्या आहेत. ऑस्ट्रेलिया अजूनही ८३ धावांनी मागे आहे.

भारतीय डावाची सलामी देण्यासाठी आलेला यशस्वी जैस्वाल खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर देवदत्त पड्डिकललाही तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना खाते उघडता आले नाही. जोश हेझलवूडने विराट कोहलीला ५ धावांवर बाद करून भारताला तिसरा धक्का दिला. लंच ब्रेक होण्यापूर्वी केएल राहुल स्टार्कच्या गोलंदाजीवर २६ धावांवर वादग्रस्तरित्या बाद ठरला. राहुलच्या विकेटवरून मोठा गोंधळ सुरू आहे.

लंच ब्रेकनंतर मिचेल मार्शने ध्रुव जुरेल (११) आणि वॉशिंग्टन सुंदर (४) यांना आपल्या गोलंदाजीवर बाद केले. ३७ धावा करत ऑस्ट्रेलियावर दबाव टाकणाऱ्या ऋषभ पंतला कमिन्सने बाद करत संघासाठी मौल्यवान विकेट मिळवली. यानंतर हर्षित राणा ७ धावा करून बाद झाला तर कर्णधार जसप्रीत बुमराह ८ धावा करून बाद झाला. भारताला शेवटचा धक्का नितीश रेड्डीच्या रूपाने बसला. नितीश रेड्डीने ५९ चेंडूत सहा चौकार आणि एका षटकारासह ४१ धावा केल्या. जोश हेझलवूडशिवाय पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि मिचेल मार्श यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणारा भारतीय संघ ऑस्ट्रेलियन वेगवान माऱ्यापुढे १५० धावांवर गारद झाला. यानंतर भारतीय गोलंदाजांनी जशात तसे उत्तर दिले, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या दिवसांचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात सात गडी गमावून ६७ धावा करु शकला.

पर्थ कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा ॲलेक्स कॅरी (१९) आणि मिचेल स्टार्क (६) धावांवर परतले. ऑस्ट्रेलियन संघ भारताच्या तुलनेत अजून अजूनही ८३ धावांनी मागे आहे. आतापर्यंत एकाही कांगारू फलंदाजाला २० च्या वर जाता आलेले नाही. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार विकेट् घेतल्या आहेत. त्याचबरोबर मोहम्मद सिराजने दोम आणि पदार्पणवीर हर्षित राणाने एक विकेट घेतली.

# वीरेंद्र सेहवागच्या मुलाची झंझावाती खेळी

## चौकार-षटकारांची आतषबाजी करत ठोकले द्विशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकेकाळी टीम इंडियाचा माजी स्फोटक फलंदाज वीरेंद्र सेहवागला जगातील भलेभले गोलंदाज घाबरायचे. आता त्याच्या मुलाने वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवले आहे. या दिग्गज फलंदाजाचा मुलगा आर्यवीर सेहवाग याने स्फोटक पद्धतीने द्विशतक झळकावत गोलंदाजांचा धुव्वा उडवला.



वीरेंद्र सेहवागचा मुलगा आर्यवीरने कूचबिहार ट्रॉफी २०२४मध्ये खळबळ उडवून दिली आहे. दिल्लीच्या या १७ वर्षीय खेळाडूने मेघालयविरुद्ध खेळल्या जात असलेल्या सामन्यात जबरदस्त द्विशतक झळकावले. आर्यवीरने आपल्या उत्कृष्ट खेळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

कूचबिहार करंडक १९ वर्षांखालील स्तरावरील बहु-दिवसीय स्पर्धेत मेघालयविरुद्ध खेळल्या जात असलेल्या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आर्यवीरने २२९ चेंडूंचा सामना करत जबरदस्त द्विशतक झळकावले. या खेळीदरम्यान त्याने ३४ चौकार आणि दोन षटकार मारून चाहत्यांची मने जिंकली. ज्युनियर सेहवागच्या या खेळीने चाहत्यांना वीरेंद्र सेहवागच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत.

आर्यवीर सेहवागला या स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात दिल्लीच्या प्लेइंग-११मध्ये संधी मिळाली नव्हती. त्यानंतर त्याला दुसऱ्या सामन्यात संघात घेण्यात आले. वडिलांप्रमाणेच हा उजव्या हाताच्या फलंदाज सलामीला येतो. त्याने सहकारी सलामीवीर अर्णव बग्गासह पहिल्या विकेटसाठी १८० धावा जोडल्या, ज्यामध्ये अर्णवने ११४ धावा केल्या. यानंतर आर्यवीरने वंश जेटली (४३) सोबत १०० धावांची भागीदारी केली. यानंतर त्याने धन्व नाकरासोबत तिसऱ्या विकेटसाठी १८८ धावांची भागीदारी केली. धन्वने ९८ धावा केल्या.

# रोहित शर्मा उद्या होणार ऑस्ट्रेलियात दाखल?




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात खेळणार नाही, मात्र दुसऱ्या सामन्यात तो संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. रिपोर्ट्सनुसार रोहित पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान संघात सहभागी होईल. तो २४ नोव्हेंबरला पर्थमध्ये भारतीय संघात दाखल होणार आहे. रोहित पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघासोबत दिसू शकतो.

रोहित शर्मा पत्नीच्या बाळंतपणामुळे घरीच राहण्याचा निर्णय घेतला होता, पण मुलाच्या जन्मानंतर तो ऑस्ट्रेलियाला जाऊ शकतो.

### दुसऱ्या कसोटीत करणार नेतृत्व


'क्रिकबझ'च्या वृत्तानुसार रोहित शर्माने बीसीसीआयच्या संबंधित अधिकाऱ्यांना रविवारी संघात सहभागी होणार असल्याचे कळवले आहे. रोहितच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराह संघाची धुरा सांभाळेल. तो २०२२मध्ये इंग्लंडविरुद्धच्या एजबॅस्टन कसोटीनंतर दुसऱ्यांदा कर्णधार बनला आहे. दुसऱ्या कसोटीत रोहित पुन्हा एकदा टीम इंडियाची कमान सांभाळेल. दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून सुरू होणार असून तो दिवस-रात्र सामना आहे.


# तीन खेळाडू आरसीबीमध्ये परतण्याची शक्यता

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघाला आतापर्यंत एकदाही आयपीएलचे जेतेपद पटकावता आलेले नाही, पण या संघाचे चाहते अनेक मोठ्या संघांनाही टक्कर देतात. याचे साधे कारण म्हणजे विराट कोहली. या वेळीही त्याला कायम ठेवण्यात आले आहे. यंदाच्या मेगा लिलावापूर्वी आरसीबीने केवळ तीन खेळाडूंना कायम ठेवले आहे. याचा अर्थ संघाला त्याचे आणखी काही खेळाडू आरटीएम अंतर्गत परत आणण्याची संधी असेल.

या वेळी बीसीसीआयने सर्व संघांना त्यांचे सहा खेळाडू कायम ठेवण्याची परवानगी दिली होती. ज्या संघांनी समान संख्येने खेळाडू राखले आहेत त्यांच्याकडे आरटीएम नसेल, परंतु ज्या संघाने यापेक्षा कमी खेळाडू रिटेन केले आहेत, ते आरटीएम म्हणजेच राईट टू मॅच कार्ड वापरून त्यांचे कोणतेही जुने खेळाडू रिडीम करू शकतात.







जर आरसीबीबद्दल बोलायचे झाल्यास, टीमने विराट कोहलीला २१ कोटी रुपयांमध्ये रिटेन करून पहिला रिटेन्शन दिला आहे. यानंतर संघाने रजत पाटीदारला ११ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यश दयालला संघाने कायम ठेवले असून त्याची किंमत पाच कोटी रुपये ठेवण्यात आली आहे.

आता आरसीबीला आरटीएम करण्यासाठी तीन संधी मिळतील. गेल्या वर्षी संघासोबत असे अनेक खेळाडू होते. ज्यांना संघ पुन्हा परत आणू इच्छितो.

**सिराज सय्यद** : या वेळी मनात येणारे पहिले नाव म्हणजे मोहम्मद सिराज. सिराजला या वेळीही लिलावादरम्यान चांगली किंमत मिळण्याची शक्यता दिसत आहे. त्याने आरसीबीसाठी आतापर्यंत ८३ बळी घेतले आहेत. तो आरसीबीसाठी सर्वाधिक बळी घेणारा तिसरा गोलंदाज आहे.

**विल जॅक** : मोहम्मद सिराजसोबत विल जॅकचाही संघ आपल्या संघात समावेश करण्याचा प्रयत्न करू शकतो. जो मागच्या वेळीही आरसीबीकडून खेळत होता. ज्यात त्याने आयपीएल २०२४मध्ये दुसरे सर्वात जलद शतक झळकावले तसेच त्याच्याबद्दल चांगली गोष्ट अशी आहे की त्याच्या स्फोटक फलंदाजीसह पार्टटाईम फिरकीपटू देखील आहे. यामुळे तो संघात पुनरागमन करण्याचा प्रबळ दावेदार आहे.

**आकाश दीप** : आरसीबीच्या तिसऱ्या आरटीएम खेळाडूच्या शक्यतांबद्दल बोललो तर त्यात आकाश दीपचे नाव येते. जो सध्या भारताच्या कसोटी संघाचा भाग आहे. तो सध्या भारताचा सर्वात वेगाने वाढणारा वेगवान गोलंदाज मानला जातो. त्याच्या टी-२० कारकिर्दीबद्दल बोललो तर त्याची सरासरी ७.७१ आहे तसेच तो वरच्या क्रमवारीत उतरून काही धावाही करू शकतो. आरसीबीने प्रयत्न केल्यास ते या तीन खेळाडूंना पुन्हा आपल्या संघात समाविष्ट करू शकतात.

# आयपीएलमध्ये पाच अष्टपैलू खेळाडू ठरणार महागडे!

## लिलावासाठी माजी क्रिकेटपटू आकाश चोप्राची भविष्यवाणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू आणि सध्याचा क्रिकेट तज्ज्ञ आकाश चोप्राने इंडियन प्रीमियर लीगच्या मेगा लिलावाबाबत काही अंदाज वर्तवले आहेत. त्याने अशा पाच अष्टपैलू खेळाडूंची निवड केली आहे, जे त्याच्या मते लिलावात सर्वात महागडे ठरतील. या यादीत केवळ एका भारतीय अष्टपैलूला स्थान मिळाले आहे.

आकाश चोप्राने आपल्या यूट्यूब चॅनलवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे, की सॅम करन पुन्हा एकदा आयपीएलमधील टॉप-५ सर्वात महागड्या अष्टपैलू खेळाडूंपैकी एक असेल. पंजाब संघ सॅम करनला परत विकत घेऊ शकतो, पण त्याच्या पगारात ५० टक्क्यांहून अधिक घट होण्याची शक्यता आहे. मी वॉशिंग्टन सुंदरला भारतीय अष्टपैलू खेळाडूंमध्ये चौथ्या क्रमांकावर ठेवीन, ज्याला अनेक संघ खरेदी करू इच्छितात. सुंदरला पुन्हा एकदा आठ किंवा नऊ कोटी रुपये मिळू शकतात.



आकाश चोप्राने तीन सर्वात महागड्या अष्टपैलू खेळाडूंमध्ये दोन ऑस्ट्रेलियन आणि एका इंग्लिश खेळाडूची निवड केली आहे. चोप्राने मॅक्सवेलला तिसऱ्या क्रमांकावर ठेवले आहे, कारण या फॉरमॅटमध्ये त्याचे नाव खूप मोठे आहे, मात्र चोप्राने यादरम्यान मॅक्सवेलची अलीकडची कामगिरी तितकीशी प्रभावी ठरली नसल्याचे वक्तव्यदेखील केले आहे.

पुढे बोलताना आकाश चोप्रा म्हणाला, आरसीबी त्यांचे आरटीएम कार्ड विल जॅकसाठी वापरू शकते. इतर अनेक संघही त्याच्या मागे जातील, कारण त्याने गेल्या हंगामात शतक झळकावले होते. मी मार्कस स्टॉयनिसला पहिल्या क्रमांकावर ठेवीन. तो लिलावात सर्वात महाग अष्टपैलू खेळाडू का असेल? मुख्य कारण म्हणजे त्याची आकडेवारी आयपीएलमध्ये चांगली राहिली आहे आणि तो या फॉरमॅटमध्ये एक मजबूत खेळाडू आहे.

२०२५च्या आयपीएल हंगामासाठी मेगा लिलाव होणार आहे. त्यासाठी आयपीएल लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह येथे होणार आहे. २०२२च्या आयपीएल हंगामानंतर हा पहिला मेगा लिलाव आहे. यंदाच्या मेगा लिलावात ५७४ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ३६६ भारतीय आणि २०८ विदेशी आहेत.

# संजय मांजरेकरांच्या 'त्या' वक्तव्यावर मोहम्मद शमीची तिखट प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या मोहम्मद शमीला आगामी आयपीएल लिलावात मोठी बोली लागणार नाही, अशी प्रतिक्रिया माजी भारतीय क्रिकेटपटू संजय मांजरेकरांनी दिली होती. आता मांजरेकरांच्या या वक्तव्यावर शमीने थेट प्रत्युत्तर दिले आहे.

टीम इंडियाचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमीने जवळपास एका वर्षानंतर स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये शानदार पुनरागमन केले. अलीकडेच त्याने रणजी ट्रॉफी सामन्यात बंगालकडून खेळताना सात विकेट्स घेतल्या होत्या. दुखापतीतून परतल्यामुळे तो तंदुरुस्त नसल्याने भारतीय संघात त्याची निवड झाली नाही, असा मीडियाचा दावा आहे. बीसीसीआयदेखील शमीबाबत कोणतेही घाई करणार नसल्याचे बोलले जात आहे.

संजय मांजरेकर स्टार स्पोर्ट्सशी बोलताना म्हणाले होते, संघ नक्कीच त्याच्यासाठी (शमी) बोली लावतील, पण शमीचा दुखापतीचा इतिहास आणि त्याच्या आधीच्या दुखापतीतून पुनरागमन करण्यासाठी लागणारा बराच वेळ लक्षात घेता त्याला मोसमाच्या मध्यात दुखापत होण्याची शक्यता आहे. जर एखाद्या फ्रँचायझीने त्याच्यावर खूप पैसा खर्च केला आणि त्याला हंगामाच्या मध्यात तो बाहेर पडल्यास, तर त्यांच्याकडे खूप कमी पर्याय असतील आणि त्यामुळे त्याचे मूल्य खाली येऊ शकते. यावर स्वत: शमीने सोशल मीडियातून उत्तर दिले आहे.

मोहम्मद शमीने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन स्टोरी शेअर केले आहे, ज्यात संजय मांजरेकरांच्या त्या वक्तव्यावर खडसून उत्तर दिले आहे. ज्यात शमीने असे लिहिले, 'बाबाजींचा जय हो..! थोडेसे ज्ञान तुमच्या भविष्यासाठी राखून ठेवा पुढे कामी येईल संजय जी? कोणाला भविष्य जाणून घ्यायचे असेल, तर सरांना (संजय मांजरेकर) भेटा'.



### पुनरागमनानंतर दमदार कामगिरी

घोट्याच्या दुखापतीतून सावरल्यानंतर मोहम्मद शमी एका वर्षाच्या कालावधीनंतर स्पर्धात्मक खेळात परतला. त्याने मध्य प्रदेशविरुद्धच्या रणजी सामन्यात बंगालसाठी प्रभावी कामगिरी केली आणि सात विकेट्स घेत संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आता शमी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये बंगालकडून खेळताना दिसणार आहे.

# 'ऋषभ पंतसह पाच यष्टीरक्षक फलंदाज आयपीएल लिलावात होतील मालामाल'

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १८व्या हंगामासाठी २४ आणि २५ नोव्हेंबरला मेगा लिलाव होणार आहे. सौदी अरेबियातील जेद्दाह या शहरात होणाऱ्या लिलावात ५००हून अधिक खेळाडूंचा समावेश आहे. माजी क्रिकेटर, समालोचक आणि क्रिकेट समीक्षक अशी ओळख असलेल्या आकाश चोप्रा यांनी मेगा लिलावात पाच विकेट किपर बॅटरसाठी मोठी चढाओढ पाहायला मिळेल, असा अंदाज व्यक्त केला आहे.




मेगा लिलावात कोणता फ्रँचायझी संघ कुणासाठी किती रुपये खर्च करणार या विषयाची क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्सुकता दिसून येते. यंदाच्या मेगा लिलावात ऋषभ पंत हा सर्वात भाव मिळणारा विकेट किपर बॅटर ठरू शकतो, असे आकाश चोप्रांनी म्हटले आहे. त्याच्यावर लागणारी बोली ही आयपीएलमधील सर्वात महागड्या खेळाडूचा प्राइज टॅग ठरणार का? याचीही उत्सुकता क्रिकेट वर्तुळामध्ये निश्चितच असेल.

भारतीय संघाबाहेर असणारा ईशान किशन हादेखील महागड्या विकेट किपर बॅटरच्या यादीत आहे. मुंबई इंडियन्सच्या संघाने त्याला रिलीज करण्याचा निर्णय घेतला होता. तो पुन्हा मुंबई इंडियनच्या ताफ्यात दिसणार की, अन्य फ्रँचायझी संघ त्याला आपल्या ताफ्यात घेणार ते पाहण्याजोगे असेल.

लोकेश राहुल हा मार्की प्लेयर्सच्या यादीत सर्वात आघाडीवर असेल. त्याच्यासाठीही मोठी बोली लागू शकेल. लखनऊ सुपरजायंट्सची १८ कोटींची ऑफर नाकारल्यावर त्याला याच्यापेक्षा अधिक रक्कम मिळणार का? ते पाहण्याजोगे असेल.

या यादी चौथ्या क्रमांकावर इंग्लंडचा विकेट किपर बॅटर फिल सॉल्टचा नंबर लागतो. स्फोटक फलंदाजीने मॅचला कलाटणी देण्याची क्षमता असणाऱ्या या खेळाडूसाठीही फ्रँचायझी संघ मोठी बोली लावताना पाहायला मिळू शकते.

जोस बटरलर हा विकेट किपर बॅटरशिवाय कॅप्टन्सीचा एक उत्तम पर्याय ठरू शकतो, असे सांगत चोप्रा यांनी या खेळाडूवर ८-१० कोटी रुपयांची बोली लागेल, असे म्हटले आहे.

### ऋषभ पंतचा पराक्रम

**नवी दिल्ली** : पर्थ कसोटीमध्ये भारताच्या ऋषभ पंतने पहिल्या डावात ३१ धावा केल्या. यासह तो जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये २ हजारपेक्षा जास्त धावा करणाऱ्या रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या पंक्तीत समाविष्ट झाला आहे. रस्ते अपघातामुळे तो दोन वर्षे क्रिकेटपासून दूर होता.

# आयपीएल लिलावाची सूत्रे यंदाही मल्लिका सागरकडे

**जेद्दाह : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५चा महालिलाव २४ व २५ नोव्हेंबर रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह येथे होणार आहे. या लिलावात लिलावकर्ते कोण असणार हे समोर आले आहे. दुबईत झालेल्या शेवटच्या आयपीएल लिलावकर्त्या मल्लिका सागर या वेळीही महालिलावात खेळाडूंचा लिलाव करताना दिसणार आहेत. मल्लिका सागर या महिला प्रीमियर लीगच्या लिलावकर्ता होत्या. आयपीएल २०२४च्या लिलावात त्यांनी ह्यू डम्स यांची जागा घेतली.

मल्लिका सागर यांना लिलावकर्त्या म्हणून दोन दशकांहून अधिक अनुभव आहे. गेल्या आयपीएल हंगामात त्यांनी आयपीएल लिलावकर्त्या म्हणून भूमिका निभावली होती होती आणि आयपीएलमधील खेळाडूंचा लिलाव करणाऱ्या त्या पहिल्या महिला लिलावकर्त्या ठरल्या. यापूर्वी आयपीएलचे लिलावकर्ते म्हणून फक्त पुरुष लिलावकर्ते होते. रिचर्ड मॅडले, ह्यू ॲडम्स आणि चारू शर्मा या दिग्गजांनी आयपीएल लिलावात लिलावकर्ते म्हणून निभावली होती.




आयपीएल २०२५च्या मधील लिलावासाठी खेळाडूंची यादी जाहीर करण्यात आली आहे, ज्यामध्ये एकूण ५७४ खेळाडूंचा समावेश आहे. ५७४ खेळाडूंपैकी ३६६ भारतीय आणि २०८ विदेशी खेळाडू आहेत. त्यात सहयोगी देशांतील तीन खेळाडूंचा समावेश आहे. दोन दिवस चालणारा हा महालिलाव भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता सुरू होईल.

### 'पीकेएल'मध्येसुद्धा बजावली होती भूमिका

फिलाडेल्फियामधील ब्रायन मावर कॉलेजमधून आर्ट हिस्ट्रीमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर मल्लिका यांनी २००१मध्ये ऑक्शन कंपनी क्रिस्टीजमध्ये लिलावकर्त्या म्हणून त्यांच्या कारकिर्दीची करिअरची सुरुवात केली. यानंतर त्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला लिलावकर्त्या ठरल्या. डब्ल्यूपीएल आणि आयपीएलपूर्वी मल्लिका सागर यांनी क्रीडा विश्वात खेळाडूंच्या लिलावात प्रो कबड्डी लीगमधून पदार्पण केले होते. प्रो कबड्डी लीगच्या (पीकेएल) आठव्या सीझनमध्ये मल्लिका लिलावकर्त्या या भूमिकेत होत्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com